संगीतमीमांसक.

भाग १ ला.

रागविचार.

लेखक व प्रकाशक
पुरुषोत्तम गणेश उर्फ अण्णा घारपुरे
व
बळवंत पुरुषोत्तम घारपुरे,
१९६ कसबा पेठ, पुणें.

मुद्रक
दत्तात्रय गणेश खांडेकर,
"लॉ प्रिंटिंग" प्रेस, ४४९ शनवार पेठ, पुणें.

सन १९११.

किंमत १॥ रुपाया.

प्रस्तावना.

नादाब्धेस्तु परंपारं न जानाति सरस्वती ॥
अद्यापि मज्जनभयात्तुम्बं वहति वक्षसि ॥ १ ॥

हल्लीं एकंदरीनें संगीतास लोकसमाजाकडून उत्तेजन मिळत असून त्यांतले त्यांत संगीताच्या शास्त्रीय पद्धतीकडे सुशिक्षित लोकांचें लक्ष्य लागत आहे ही आनंदाची गोष्ट होय. शाळाखात्यानेंही संगीत हा विषय प्राथमिकशाळांतून हल्लीं ठेविला असून शास्त्रशुद्ध गायनाचें वळण मुलांस लहानपणापासून लागावें अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. अशावेळीं संगीताचे अध्यापक व संगीताची गोडी असणारा सर्व-साधारण वाचकवर्ग यांना या विषयांतील शास्त्रीय माहिती सुलभ करून देणारें एखादें सुबोध पुस्तक असावें अशा हेतूनें "संगीतमीमांसक" नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा आम्हीं उपक्रम केला आहे, व हल्लीं हा त्याचा पहिला भाग छापिला आहे. याचा काळजी-पूर्वक अभ्यास व उपयोग केला असतां, संगीताचें केवळ अंधपरंपरेनें सेवन न करितां स्वतःची बुद्धी चालवून नवीन प्रबंध व नवीन रचना करून संगीताचें ज्ञान व गोडी या दोहोंस चांगली भर घालितां येईल अशी आमची समजूत आहे.

सदर्हु पुस्तकांत रागाची उपपत्ती, वर्गीकरण, नियम व प्रबंध रचण्याचे प्रकार या सर्व गोष्टी आमच्या आजपर्यंतच्या अनुभवानें सिद्ध झाल्या तशा दिलेल्या असून त्या स्वतंत्र शोधकबुद्धीचें फळ असें आम्ही मानितों. संगीत विषयावरचीं दुसरीं पुस्तकें वाचणारांस

या गोष्टी अपूर्व आहेत असेंच आढळेल. तथापि, सूक्ष्म निरीक्षण करणारास असें दिसून येईल कीं, या विषयावर संगीत रत्नाकरासारख्या मूर्धाभिषिक्त संस्कृत ग्रंथामध्यें जी उपपत्ती दिलेली आहे, तिच्याशीं आमचे सिद्धांत विसंवादी नसून प्राय: मिळतेच आहेत. या जुन्या ग्रंथांचें अध्ययन करणारास त्या काळचे संगीतभक्तांची दृष्टी किती सूक्ष्म रीतीनें चालत होती हें तर कळेलच, परंतु संगीताच्या महोदधींत स्वतंत्र शोधकबुद्धीनें व धाडसानें बुडी मारणारास अद्यापिही रत्नें वेंचण्यास किती मोठा प्रांत मोकळा राहिला आहे हेंही कळून येईल.

ता. २० मे १९११ इ. पुणें. अण्णा घारपुरे.

॥ श्रीगुरवेनमः ॥

संगीतमीमांसक.

भाग १ ला.

रागविचार.

श्रीगणेशायनमः—गाण्यावाजविण्यांत सात स्वर आहेत, त्यांचीं नांवें:–१ **षड्ज**, २ **ऋषभ**, ३ **गांधार**, ४ **मध्यम**, ५ **पंचम**, ६ **धैवत** व ७ **निषाद**. या सात स्वरांना मिळून **स्वरसप्तक** असें ह्मणतात.

या सात स्वरांपैकीं **षड्ज** व **पंचम** खेरीज बाकींच्या पांच स्वरांचे **कोमल** व **तीव्र** असे दोन भेद होतात. षड्ज, पंचम व बाकीचे पांच कोमल व पांच तीव्र मिळून एका सप्तकांत एकंदर बारा* स्वर होतात.

---

* संगीतशास्त्रांत श्रुती बावीस आहेत, असें सांगितल्यावरून कित्येकांचा असा गैरसमज होण्याचा संभव आहे कीं, एका **ग्रामांत** २२ स्वर उपयोगांत आणिले पाहिजेत; परंतु आमच्या मतें स्वर बाराच आहेत व त्यावद्दल याच पुस्तकाचे परिशिष्टांत **श्रुति, स्वर** व **ग्राम** यांबद्दल खुलासा केला आहे तो पहावा.

त्यांचीं नांवें.	गातांना उच्चार	लेख
१ षड्ज	सा	
२ कोमल ऋषभ	रि री, कचित् रे	
३ तीव्र ऋषभ	,, ,, ,,	
४ कोमल गांधार	ग, गा	ग
५ तीव्र गांधार	,, ,,	
६ कोमल मध्यम	म, मा	म
७ तीव्र मध्यम	,, ,,	म
८ पंचम	प, पा	प
९ कोमल धैवत	ध, धा	ध
१० तीव्र धैवत	,, ,,	ध
११ कोमल निषाद	नि, नी	न
१२ तीव्र निषाद	,, ,,	न

स्वर सप्तकें चार आहेत, त्यांचीं नांवें:—

१ अणुमंद्र, २ मंद्र, ३ मध्य, ४ तार.

साधारण आपण ज्या आवाजांत बोलतों, त्या आवाजा स्वरसप्तकास मध्य सप्तक म्हणतात; लिहितांना यांतील स्वर जसे तसेच खुणे (चिन्हा) वांचून लिहावेत. जसें:–स, रा, र, गा, ग,

मध्य सप्तकाच्या दुप्पट उंच आवाजांतील स्वरसप्तकास सप्तक म्हणतात. तार सप्तकांतील स्वरांच्या खालीं एक टिंब द जसें:–स़, रा़, ऱ, गा़, ग़, इ०.

मध्य सप्तकाच्या निम्पट नीच आवाजांतील स्वर सप्त मंद्र सप्तक म्हणतात. मंद्रसप्तकांतील स्वरांच्या माथ्यावर एक द्यावें. जसें–सं, रां, रं, गां, गं, इ०.

मंद्र सप्तकाच्या निम्पट नीच आवाजांतील स्वर सप्तकास **अणुमंद्र** सप्तक ह्मणतात. अणुमंद्र सप्तकांतील स्वरांच्या माथ्यावर दोन टिंबें द्यावीं. जसें–सं, रां, रं, गां, गं, इ०.

गाण्यांत बहुशः मंद्र, मध्य व तार या तीन सप्तकांचा उपयोग करितात.

वाद्यांत चारी सप्तकांचा उपयोग करितात.

हार्मोनियम, पिआनो वगैरे वाद्यांत चारापेक्षां अधिक सप्तकांचा उपयोग करितात. एका सप्तकास जो हिशेब लावावयाचा, तोच सर्व सप्तकांस लागूं होतो, तेव्हां सप्तकांच्या संख्येप्रमाणें व्यवस्था करावयास कठीण पडणार नाहीं.

रागविचार.

रागः–हा शब्द संस्कृत रञ्ज = रंजविणें–या धातूपासून उत्पन्न झाला आहे; **राग** या शब्दाचा अर्थ मनाचें रंजन करणारा. मनाचें रंजन करणारा या अर्थापासून संगीतामध्यें राग शब्दापासून काय बोध घ्यावयाचा हें कळत नसल्यामुळें शास्त्रकारांनीं **राग** या शब्दाची एक विशिष्ट व्याख्या केली. कारण मनाचें रंजन हें रागाचें कार्य (परिणाम) होय. मनाचें रंजन करणारा या शब्दापासून केवळ संगीतांत ज्याला राग ह्मणतात, त्याचाच बोध न होतां अनेक शब्दांचा बोध होऊं शकेल. उदाहरणार्थः–तालानेंही मनाचें रंजन होतें; ह्मणून राग व ताल हे एक नव्हत. अशा प्रकारें घोटाळा होऊं नये ह्मणून रागाची व्याख्या केली तीः–विशिष्ट नियमानुसार केलेली स्वरांची रचना ह्मणजे **राग** होय. ही रचना नियमानुसार केली असल्यामुळें मनाचें रंजन करणारी असते; कारण, नियम

ठरविताना ते मनाचें रंजन या कार्याकडे पूर्ण लक्ष्य देऊन ठरविले आहेत.

रागांत मुख्य गोष्टी सहा आहेत. १ आरोहण, अवरोहण. २ वादीस्वर. ३ संवादीस्वर. ४ अनुवादीस्वर. ५ ग्रहस्वर. ६ न्यासस्वर.

त्यांचीं लक्षणें.

आरोहण:–नीच स्वराकडून उंच स्वराकडे जाणें. उ०–स पासून रकडे–स, र, ग, मा, प, ध, न असे स्वर चढवीत जाणें.

अवरोहण:–उंच स्वराकडून नीचस्वराकडे येणें. उ०–नकडून धकडे–न, ध, प, मा, ग, र, स, असे स्वर उतरवीत येणें.

वादीस्वर (पहिल्या प्रतीचा स्वर):–जो स्वर रागांत फार वेळ लांबविला असतो, किंवा रागांत ज्या स्वराचें उच्चारण बाकीच्या स्वरांपेक्षां अधिक असतें तो स्वर. रागांत हा एकच असतो. उ०–**हिंडोल** रागांत तीव्र गांधार.

संवादीस्वर (दुसऱ्या प्रतीचा स्वर):–जो स्वर रागांत वादी स्वरापेक्षां कमी, परंतु बाकीच्या सर्व स्वरांपेक्षां अधिक वेळ लांबविला असतो, अथवा रागांत ज्या स्वराचें उच्चारण वादी स्वरापेक्षां कमी, परंतु बाकीच्या स्वरांपेक्षां अधिक असतें, तो स्वर. रागांत हाही एकच असतो. उ० **हिंडोल** रागांत तीव्र निषाद.

प्रचारांत संवादीस्वराचा उपयोग केलेला क्वचित् आढळतो.

अनुवादीस्वर (तिसऱ्या प्रतीचा स्वर):– वादी व संवादी स्वरांशिवाय बाकीचे स्वरांस त्या रागांतील **अनुवादी** स्वर म्हणतात. रागांत यांची संख्या तिहींपेक्षां कमी नसते.

उ० **हिंडोल** रागांत स, म ध.

ग्रहस्वर (उत्पत्तिस्वर) :--ज्या स्वरापासून रागास आरंभ करावयाचा तो. उ० **हिंडोल** रागांत तीव्र गांधार.

न्यासस्वर (अंत्यस्वर) :--ज्या स्वरावर राग संपवावयाचा तो. उ० **हिंडोल** रागांत तीव्र गांधार.

ग्रहस्वर, न्यासस्वर वेगळे असलेच पाहिजेत असें नाहीं.

रागाचे मुख्य भेद तीन आहेत.

१ औडवराग, २ षाडवराग, ३ संपूर्णराग.

त्यांचीं लक्षणें.

औडवराग:–पांच स्वरांनीं युक्त जो राग तो.

उ० राग **हिंडोल** यांत स, ग, म, ध, न हे पांच स्वर आहेत.

षाडवराग:–सहा स्वरांनीं युक्त जो राग तो.

उ० राग **मारवा** यांत स, रा, ग, म, ध, न हे सहा स्वर आहेत.

संपूर्णराग:–सात स्वरांनीं युक्त जो राग तो.

उ० राग **कल्याण**. यांत स, र, ग, म, प, ध, न हे सात स्वर आहेत.

रागाच्या मुख्य जाती पांच आहेत.

(१) शुद्धराग, (२) मिश्रराग, (३) वक्रस्वरयुक्तराग, (४) छायालग राग व (५) वेसरराग.

त्यांचीं लक्षणें.

१ शुद्धराग–ज्या रागांत आरोही व अवरोही स्वर एकच असतात ते. उ० राग **हिंडोल** यांत स, ग, म, ध, न, सं हे स्वर

आरोही आहेत, व सं, न, ध, म, ग, स हे स्वर अवरोही आहेत. यांवरून असें दिसून येईल कीं, शुद्धरागाचे स्वर एका ओळींत लिहितां येतात व ते डावीउजवीकडून वाचिले असतां आरोहण–अवरोहण दाखवितात.

शुद्धौडवराग पांच स्वरांनीं युक्त असतो.

उ० राग **हिंडोल**--यांत स, ग, म, ध न हे पांच स्वर आहेत.

शुद्ध षाडवराग--सहा स्वरांनीं युक्त असतो.

उ० राग **मारवा**--स, रा, ग, म, ध, स हे सहा स्वर आहेत.

शुद्धसंपूर्णराग—सात स्वरांनीं युक्त असतो.

उ० राग **कल्याण**--यांत स, र, ग, म, प, ध, न हे सात स्वर आहेत.

मिश्रराग—ज्या रागांत आरोही व अवरोही स्वर एकच नसतात, ह्मणजे ज्या रागांत आरोही व अवरोही स्वरांत बदल असतो तो.

उ० राग **वसंत**--यांत आरोही--स, ग, म, ध, न, सं हे स्वर लागतात ; परंतु अवरोही--सं, न, ध, मा, ग, स हे स्वर लागतात. यावरून असें दिसतें कीं, **शुद्धरागाचे** स्वराप्रमाणें **मिश्ररागाचे** स्वर एकाच ओळींत लिहितां यावयाचे नाहींत. **मिश्ररागांत** आरोहण व अवरोहण निरनिराळें लिहिलें पाहिजे. **शुद्ध** रागापासूनच **मिश्रराग** होतात. एका शुद्धरागाचें आरोहण व दुसऱ्या शुद्धरागाचें अवरोहण घेऊन **मिश्र** राग होतो. उ० राग–**देशकारी**.

आ० स, रा, ग, प, धा, सं } विभास.
अव० सं, ध, प, ग, र, स } भूप.

मिश्र रागाचे मुख्य भेद ९ आहेत.

१ मिश्रौडव, २ मिश्रषाडव, ३ मिश्रसंपूर्ण, ४ औडवषाडव, ५ औडवसंपूर्ण, ६ षाडवौडव. ७ षाडवसंपूर्ण, ८ संपूर्णौडव, ९ संपूर्णषाडव.

त्यांचीं लक्षणें.

१ **मिश्रौडव** रागांत जे स्वर आरोहणाला असतात त्यांपेक्षां एकतरी स्वर अवरोहणामध्यें भिन्न असतो. पण आरोहाची किंवा अवरोहाची संख्या वेगळी वेगळी मोजली तर पांच स्वरांपेक्षां अधिक नसते.

उ०–राग **नवमनोहरी.**

आरोहण–स, र, मा, धा, ना, सं.

अवरोहण–सं, ना, प, मा, र, स.

या उदाहरणांत आरोहणामध्यें व अवरोहणामध्यें स्वरांची संख्या पांचच आहे, परंतु आरोहणांत कोमल धैवत आहे तो गाळून अवरोहणांत त्याच्या ऐवजीं **पंचम** घेतला आहे.

२ **मिश्रषाडव** रागांत जे स्वर आरोहणांत असतात त्यांपेक्षां एकतरी स्वर अवरोहणांमध्यें भिन्न असतो, पण स्वरांची संख्या सहापेक्षां अधिक नसते.

उ० राग **मणिगिरी.**

आरोहण–स, र, गा, मा, प, ना, स ;

अवरोहण–स, ना, ध, मा, गा, र, स ;

या उदाहरणांत आरोहणामध्यें व अवरोहणामध्यें स्वरांची संख्या सहाच आहे. परंतु आरोहणांत पंचम आहे तो गाळून अवरोहणांत त्याच्याऐवजीं तीव्र **धैवत** घेतला आहे.

मिश्रसंपूर्ण रागांत जे स्वर आरोहणाला असतात, त्यांपेक्षां एकतरी स्वर अवरोहणामध्यें भिन्न असतो.

उ० राग **देवगांधार.**

आ०--स, र, गा, मा, प, धा, ना, स़ ;

अव०--स़, न, ध, प, मा, गा, रा, स ;

या उदाहरणांत आरोहणामध्यें व अवरोहणामध्यें स्वरांची संख्या सातच आहे, परंतु आरोहणांत तीव्र **ऋषभ**, कोमल **धैवत** व कोमल **निषाद** आहेत ते गाळून अवरोहणामध्यें त्यांच्याऐवजीं अनुक्रमें कोमल **ऋषभ**, तीव्र **धैवत** व तीव्र **निषाद** घेतला आहे.

औडवषाडव रागांत आरोहणाला पांच स्वर व अवरोहणाला सहा स्वर असतात.

उ० राग **मलहारी.**

आ०—स, रा, मा, प, धा, स़;

अव०—स़, धा, प, मा, ग, रा, स;

औडव संपूर्ण रागांत आरोहणाला पांच स्वर व अवरोहणाला सात स्वर असतात. उ०—राग **बिहाग.**

आ०—स, ग, मा, प, न, स़;

अव०—स़, न, ध, प, मा, ग, र, स;

षाडवौडव रागांत आरोहणाला सहा स्वर व अवरोहणाला पांच स्वर असतात. उ०—राग **योग भैरवी.**

आ०—स, र, गा मा, प, धा, स़;

अव०—स़, ना, धा, प, र, स;

षाडव संपूर्ण रागांत आरोहणाला सहा स्वर व अवरोहणाला सात स्वर असतात.

उ०–राग मत्स्यबहुळी.

आ०–स, रा, ग, प, धा, न, सं;

अव०–सं, न, धा, प, मा, ग, रा, स;

संपूर्णौडव रागांत आरोहणाला सात स्वर व अवरोहणाला पांच स्वर असतात.

उ० राग उदयचंद्रिका.

आ०–स, र, गा, मा, प, धा, ना, सं;

अव०–सं, धा, प, मा, र, स;

संपूर्ण षाडव रागांत आरोहणाला सात स्वर व अवरोहणाला सहा स्वर असतात.

उ०–राग भल्लाटी.

आ०–स, रा, ग, मा, प, ध, ना, सं;

अव०–सं, ना, प, मा, ग, रा, स;

वक्रस्वरयुक्त राग.

सरळ आरोही किंवा अवरोही स्वर उलट खाऊन पुनः क्रमानें जातात, तेव्हां त्यांस वक्र स्वर ह्मणतात. जसें:—

१ स, र, ग, म, प, ध, +ग म, प, ध, न, सं;

२ सं, न, ध, प, म, ग, +ध, प, म, ग, र, स;

यांत अनुक्रमें ग व ध हे स्वर वक्र आहेत. यांच्या तऱ्हा किंवा यांचे प्रकार पुष्कळ आहेत. अशा वक्र स्वरांच्या योगानें रागाची एक स्वतंत्र जाती होते; या जातीचे रागांना आह्मीं वक्र स्वर-युक्त राग असें नांव दिलें आहे. उ०—राग पूर्ण चंद्रिका.

आ०–स, र, ग, मा, प, मा, ध, न, सं;

अव०–सं, न, प, ध, प, मा, ग, मा, र, स;

आरोही वक्रस्वरांनींयुक्त, अवरोही वक्रस्वरांनींयुक्त, आरोही व अवरोही वक्रस्वरांनींयुक्त, असे या रागांचे अनेक भेद होतात; परंतु प्रस्तुत पुस्तकांत फक्त शुद्ध राग व त्यांचे सहाय्यानें होणारे राग यांचाच विचार करावयाचा आहे; ह्मणून या रागांचीं सर्व उदाहरणें दिलीं नाहींत. यासंबंधानें विचार पुढील भागांत करूं.

छायालग राग.

या रागांत विशिष्ट स्वरांची छाया उपयोगांत आणिली असते; परंतु त्यास्वरांचें उच्चारण केलें असतां रागाचें लक्षण बदलतें. यावरून असें स्पष्ट दिसेल कीं, छायालग रागांत ज्या स्वरांच्या छायेचा उपयोग केला असेल ते स्वर रागांमध्यें आहेत असा स्पष्ट भास होतो, परंतु ते स्वर ' सरगम ' मध्यें उच्चारितां येत नाहींत. ते स्वर ' सरगम ' मध्यें उच्चारिले कीं रागाचें स्वरूप बदलतें; रागहानी होते. यास्तव ते स्वर आकारांत दाखविले पाहिजेत. तात्पर्य, स्पष्ट अलंकारिक स्वरांच्या सहाय्यावांचून ज्या रागाचें आरोहण–अवरोहण दाखवितां येतच नाहीं, त्या रागास **छायालग** राग ह्मणावें. उ०—राग अडाणा.

आ०—स, र, $\overset{+}{\text{गा}}$, मा, प, $\overset{+}{\text{धा}}$, ना, सं;

अव०—सं, ना, $\overset{+}{\text{धा}}$, प, मा, $\overset{+}{\text{गा}}$, र, स;

या रागांत **गा** व **धा** या स्वरांच्या छायेचा उपयोग केलेला आहे, तेव्हां जर ' सरगम ' करितांना **गा** व **धा** या स्वरांचें उच्चारण केलें तर **अडाणा** रागाचें स्वरूप बदलेल. म्हणून ' सरगम ' गातांना हे स्वर अलंकारिक (आकारांत) दाखविले पाहिजेत. हे स्वर आकारांत दाखवितांनासुद्धां या स्वरांवर फार विराम (थांबणें, लांबविणें) न करण्याची खबरदारी घेतली पाहिजे; ह्मणजे या स्वरांच्या छायेचा स्पष्ट भास होण्यापुरतांच उपयोग करावा.

२ रें उ०--राग बिलावल.

आरोहण--स, र, ग, मा, प, ध, न, सं;

अव०--सं, ना, ध, प, मा, ग, र, स;

या रागांत अवरोहणामध्यें कोमल निषादाच्या छायेचा उपयोग केला आहे. याही रागांचे पुष्कळ प्रकार होतात, त्यांचा विचार पुढील भागांत करूं.

वेसरराग.

केवळ जलदलयीमध्यें गावयाचे जे राग, त्यांना **वेसरराग** ह्मणतात. या रागांतील स्वर द्रुतलयींत गावयाचे असतात.

उ० राग **सिंधभैरवी.**

आ०--स, र, गा, मा, प, धा, ना, सं;

अव०--सं, ना, धा, प, मा, गा, र, स;

वरील स्वर **दरबारी कानडा** या रागासही आहेत. तेव्हां असें स्पष्ट दिसेल कीं, रागाची लय बदलली असतां रागाचें स्वरूप बदलतें. हेच स्वर सावकाश गाइले असतां **दरबारी कानडा** राग होतो, परंतु जलद गाइले कीं **सिंधभैरवी** होते. या रागाचा विचार पुढील भागांत करूं.

प्रचारांत ज्यांना **जिल्हा** असें ह्मणतात, त्या रागांचा समावेश **वेसर** रागांतच होतो. सावकाश गावयाचे राग जलद गाइले असतां त्या रागांचे जिल्हे निर्माण होतात. हें, **कानड्याची--सिंधभैरवी** होते, यावरून लक्ष्यांत येईल. जिल्ह्याबद्दल विशेष विवेचन **वेसर** रागांचे विवेचनामध्यें येईल.

येणेंप्रमाणें रागांच्या पांच जाती आहेत. त्यांचे लक्षणांवरून असें दिसून येईल कीं, स्वरांमध्यें मागेंपुढें जाणें, स्वरांची आवृत्ती

करणें, स्वरांवर कमीअधिक प्रमाणानें थांबणें व अलंकारिक स्वरांचा उपयोग करणें, यांवर गाणें वाजविणें अवलंबून आहे. विण्याला पक्की तार लावून डाव्या हातानें खुंटी धरून, उजव्या हातानें तारेवर आघात देऊन खुंटी मागेंपुढें फिरवून गाण्या-वाजविण्याचें सर्व काम करितां येतें, असें आह्मी स्वानुभवानें सांगूं शकतों. तंबोऱ्याचे खुंटीचे सहाय्यांत मागेंपुढें जाणें, आवृत्ति करणें व कमीअधिक प्रमाणानें थांबणें, यांशिवाय अन्य साधन नाहीं हें उघडच आहे.

पांच जातींच्या रागांपैकीं शुद्ध, मिश्र, वक्रस्वरयुक्त व बेसर या चार जातींच्या रागांत दोन प्रकारचें गाणें होतें. १ साध्या स्वरांचें गाणें. २ अलंकारिक स्वरयुक्त गाणें. छायालग जातीचे राग मात्र अलंकारिक स्वरांच्या सहाय्यावांचून गातां येत नाहींत.

एकंदर स्वर बारा आहेत ह्मणून सांगितलें, तरी या बारा स्वरांची पक्की माहिती झाली पाहिजे. ह्मणून **कल्याण, दरबारी कानडा** व **भैरव** या तीन रागांचा पूर्ण अभ्यास करावा; म्हणजे बारा स्वरांची पक्की माहिती होईल.

२ राग भैरव

आरोहण--स, रा, ग, मा, प, धा, न, स़ ;
अवरोहण--स़, न, धा, प, मा, ग, रा, स ;

१ राग कल्याण

आरोहण--स, र, ग, म, प, ध, न, स़ ;
अवरोहण--स़, न, ध, प, म, ग, र, स ;

१ राग दरबारी कानडा

आरोहण--स, र, गा, मा, प, धा, ना, स़ ;
अवरोहण--स़, ना, धा, प, मा, गा, र, स ;

या तिन्ही रागांत मिळून बारा स्वरांचा उपयोग केलेला आहे.

प्रचारामध्यें असें आढळून येतें कीं, गवय्यांस किंवा बजवय्यांस कांहीं मर्यादित रागांची माहिती असते. कोणास १०० रागांची माहिती असतें, तर कोणास ५० च राग येत असतात. संस्कृत ग्रंथांतून तर " न रागाणांच तालानामन्तः कुत्रापि विद्यते— अनंता वै रागाः" अशीं अनेक वाक्यें आढळतात. मग आमच्या गवय्यांस व बजवय्यांस अगदीं नियमित रागांचीच माहिती कां असावी, हा वास्तविक प्रश्न विचारी माणसाच्यापुढें उभा राहतो. संस्कृत ग्रंथांत तरी थोड्याच रागांची माहिती दिली आहे, परंतु ज्या रागांची माहिती दिली आहे ते राग रागांचीं उदाहरणें ह्मणून दिले आहेत. त्रैराशिकाची उपपत्ति समजावून दिल्यावर ज्याप्रमाणें १ उदाहरण करून दाखविलें कीं असंख्य उदाहरणें करितां येतात, त्याचप्रमाणें रागाची व्याख्या, जाति, रागाला लागणाऱ्या अवश्य गोष्टी, वगैरेची माहिती देऊन प्रत्येक प्रकारच्या कांहीं रागांचीं उदाहरणें देण्यांत, बाकीची माहिती ज्याची त्यास मिळवितां येईल असाच संस्कृत ग्रंथकारांचा आशय असावा. संस्कृतग्रंथांसंबंधें आमचें काय मत आहे तें आह्मी या पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत देणार आहों. सध्यां एवढें मात्र सांगितलें पाहिजे कीं, संस्कृत ग्रंथांत जी माहिती दिली आहे, ती केवळ व्युत्पत्तीच्या जोरावर समजणार नाहीं; शिवाय ती माहिती जितकी स्पष्ट असावयास पाहिजे तितकी स्पष्टही नाहीं. **संगीतरत्नाकर** हा संस्कृतांतील गाण्याच्या सर्व ग्रंथांचा आधारस्तंभ होय. याचाच अनुवाद इतर ग्रंथांत निराळ्या शब्दांत व छंदांत केलेला आहे. तेव्हां **संगीतरत्नाकर** वगैरे संस्कृत-ग्रंथांचें काळजीपूर्वक परिशीलन करून व प्रचारांत उपलब्ध असलेल्या कलावंतांच्या कृतींचें सूक्ष्म निरीक्षण करून आह्मीं असें ठरविलें आहे कीं, विवक्षित नियमांच्या आधारानें आपणास राग करितां

येतात. या नियमांप्रमाणें राग केले कीं, संस्कृतग्रंथांत दर्शविल्याप्रमाणें असंख्य रागांची माहिती होते. हे नियम आह्मींच केले आहेत. इतर कोणत्याही ग्रंथांत दिलेले नाहींत.

शुद्ध रागाची रचना करण्याचे नियम.

बारा स्वरांपैकीं कोणतेही पांच स्वर आरोही व अवरोही अनुक्रमानें (कांहीं नियमानुसार) घेतलें ह्मणजे **राग** होतो. उदाहरणार्थ **स, र, ग, प, ध, सं; सं, ध, प, ग, र** असे पांच स्वर घेतले कीं प्रचारांतील **भूप** राग होतो. पांच स्वरांपेक्षां कमी स्वर घेतले असतां ते कानाला गोड लागतील, नाहीं असें नाहीं ; पण त्यांना **राग** अशी संज्ञा प्राप्त होत नाहीं.

एका स्वराच्या गाण्यास **आर्चिक** म्हणतात. दोन स्वरांच्या गाण्यास **गाथिक** ह्मणतात. तीन स्वरांच्या गाण्यास **सामिक** ह्मणतात. चार स्वरांच्या गाण्यास **स्वरांतर** ह्मणतात. पांचपासून बारा स्वरांपर्यंतचे गाण्यास **राग** अशी संज्ञा प्राप्त होते.

नियम पहिला :–यावरून आह्मीं प्रथम नियम असा केला कीं, प्रत्येक रागांत निदान पांच तरी स्वर असलेच पाहिजेत.

नियम दुसरा :–यापुढील नियम ह्मटला ह्मणजे प्रत्येक रागरचनेंत **स** हा स्वर असलाच पाहिजे. **षड्जा**शिवाय कोणताही राग होत नाहीं.

नियम तिसरा :—रागांत एक **वादी** (पहिल्या प्रतीचा स्वर) व एक **संवादी** (दुसऱ्या प्रतीचा स्वर) असे दोन स्वर असावे लागतात. यांचा परस्परांशीं संबंध **स** आणि **प** अथवा **स**

आणि मा यांचा जो संबंध, तोच असतो; ह्मणजे वादी स्वरास षड्ज कल्पिला असतां त्याचा **संवादी** स्वर, त्याचा कोमल मध्यम अथवा पंचम झाला पाहिजे. अशा रीतींचा संबंध पाहूनच आपण निवडलेल्या स्वरांत वादी, संवादी कायम करावे.

आपण घेतलेल्या स्वरांत **वादी, संवादी** स्वर कायम करितां यावे ह्मणून असा नियम समजावा कीं, **वादी** स्वरापासून **संवादी** स्वर आठवा किंवा सहावा असावा. हा हिशेब बारा स्वरांमधला आहे.

स, रा, र, गा, ग, मा, म, प, धा, ध, ना, न

असे बारा स्वर मांडावे, व प्रत्येक स्वरास **वादी** स्वर कल्पून त्यापासून आठवा स्वर कोणता व सहावा स्वर कोणता हें पहावें, ह्मणजे प्रत्येक **वादी** स्वरास दोन **संवादी** स्वर निघतील. पैकीं आपण तयार केलेल्या स्वररचनेंत जी **वादी--संवादीची** जोडी आढळेल ती घ्यावी. प्रथम स्वर **स** आहे. यापासून आठवा स्वर **प** आहे व सहावा स्वर **मा** आहे. तेव्हां **स** वादी असेल तेव्हां **प** किंवा **मा** यांपैकीं जो असेल तो **संवादी** समजावा. दोन्ही असतील तेथें **प** (आठवा) घेतलाच पाहिजे, असा नियम समजावा. आठवा न जमेल तेथेंच सहावा घ्यावयाचा. दुसरा स्वर **रा** आहे. त्यास **वादी** कल्पिला तर त्यापासून आठवा स्वर **धा** व सहावा स्वर **म** आहे. तेव्हां **रा** वादी असेल तर **धा** किंवा **म** संवादी समजावा.

याच हिशेबानें पुढील कोष्टक तयार केलें आहे.

वादी–संवादी स्वरांचें कोष्टक.

वादी कल्पिला तर		८ वा संवादी.	६ वा संवादी.
१	स,	प,	मा,
२	रा,	धा,	म,
३	र,	ध,	प,
४	गा,	ना,	धा,
५	ग,	न,	ध,
६	मा,	स,	ना,
७	म,	रा,	न,
८	प,	र,	स,
९	धा,	गा,	रा,
१०	ध,	ग,	र,
११	ना,	मा,	गा,
१२	न,	म,	ग.

नियम चवथा :–ह्मटला ह्मणजे प्रत्येक रागरचनेंत **मध्यम** किंवा **पंचम** यांपैकीं निदान एकतरी स्वर असलाच पाहिजे. दोन्ही असले तरी चालेल.

नियम पांचवा :–एकच स्वर लागोपाठ कोमल व तीव्र घेऊं नये. रा, र; गा, ग; मा, म; धा, ध; आणि ना, न या पांच जोड्यांपैकीं कोणतीही जोडी एकदम उपयोगांत आणूं नये. बारा स्वरांपैकीं वाटेल ते स्वर पसंत करून राग तयार करावयाचे वेळीं या जोड्यांपैकीं एक एक स्वर वाटेल तो घ्यावा. कारण एकच स्वर

लागोपाठ कोमल व तीव्र घेतला असतां कानाला वाईट लागेल व मजा वाटणार नाहीं; ह्मणून रा घेतला असतां र घेऊं नये, ग घेतला असतां गा घेऊं नये, इ. इ. तात्पर्य, कोमल तरी घ्यावा, अथवा तीव्र घ्यावा; पण तोच स्वर कोमल व तीव्र घेऊं नये.

वादी स्वराचें महत्त्व.

कोणत्याही स्वररचनेंत **वादी** स्वरावरून राग बदलतात. **सारंग** व **सुहा** या रागांना तेच स्वर लागतात (स, र, मा, प, ना, सः); परंतु जेव्हां **र वादी** असतो, तेव्हां **सारंग** ह्मणतात; व तोच **र** बदलून **मा वादी** केला कीं, **सुहा** राग होतो, ह्मणून रागाचें स्वरूप वादीस्वरावर अवलंबून असतें.

रागास आरंभ कसा करावा.

मुख्यतः रागाला आरंभ **वादी** स्वरापासूनच करावा. **षड्जा**पासूनही रागाला आरंभ करितात. कोणत्याही स्वरापासून रागाला आरंभ केला तरी होतां होईतों लवकर **वादी** स्वरावर आलें पाहिजे, हा नियम समजावा.

राग कसा संपवावा.

रागाचा शेवटही **वादी** स्वरावरच करावा, हा उत्तम मार्ग होय; **स**वरही रागाचा शेवट करितात. नवीन अभ्यास करणारांनीं **वादी** स्वरावरच रागाचा आरंभ करून त्यावरच राग संपवावा. रागाचें स्वरूप पूर्णपणें ओळखितां आलें ह्मणजे मग रागाची छाया (रागाच्या स्वरूपाचा मनावर उमटलेला ठसा किंवा मनावर झालेला परिणाम) बिघडणार नाहीं, अशा तऱ्हेनें राग संपविला तरी चालेल.

राग करण्याचे वर जे नियम दिले आहेत, त्यांना कांहीं अपवाद आहेत. उदाहरणार्थ, प्रत्येक रागांत **मध्यम** अथवा **पंचम** यांपैकीं कोणता तरी एक स्वर जरूर असला पाहिजे, असा नियम करणें आम्हांस भाग पडलें. याचें कारण असें आहे कीं, प्रचारांत सध्यां जेवढ्या रागांचा उपयोग दृष्टीस पडतो, त्यांत **मध्यम** व **पंचम** हीन असा राग मुळींच नाहीं. जरी प्रचारांत असा राग आढळत नाहीं, तथापि ग्रंथांत **पुरूहूतिका** या नांवाचा एक राग सांपडतो.

आ०—**स, र, ग, ध, न, स**;
अव०—**स, न, ध, ग, र, स**;

हा राग गाऊन, वाजवून पाहिलें तों असें आढळून आलें कीं, जरी **मध्यम** व **पंचम** हे स्वर गाळिले होते, तरी या रागांत ते स्वर आहेत असा स्पष्ट भास झाला, व जेव्हां जेव्हां **षड्जावर** यावें, तेव्हां तेव्हां हा भास दृढ होत चालला. यावरून आम्हीं असें ठरविलें कीं, **मध्यम** व **पंचम** हे स्वर **षड्जाचे** संवादी असल्यामुळें त्यांचा भास स्पष्ट होतो. मग आम्हीं त्या रागांत **मध्यम** व **पंचम** स्वरांचा उपयोग करून पाहिला, तों पहिल्या व दुसऱ्या रागांतील फरक एकदम ओळखितां येईना. दोहोंत फरक होतो हें निर्विवाद आहे; पण तो एकदम ओळखितां येईना. हा कदाचित् मनावर झालेल्या पूर्व ग्रहाचा परिणाम असेल. तशाच प्रकारची संवय प्रथमपासून केली असतां **मध्यम**, **पंचम**हीन असा राग कदाचित् गोड लागण्याचा संभव आहे. पण तसा राग प्रचारांत नाहींच; म्हणून आम्हीं असा नियम केला आहे कीं, प्रत्येक रागांत **मध्यम** व **पंचम** यांपैकीं कोणता तरी एक स्वर असलाच पाहिजे. दोन्ही असले तरी चालतील, हें सांगावयास नकोच. आमच्या नियमानुसार

राग करितांना असें आढळून येईल कीं, धैवत व निषादहीन असेही राग तयार होतील.

स, रा, र, गा, ग, मा, म, प.

वरील स्वरांतून ५ स्वर चुणल्यास धैवत निषादहीन राग होतील. प्रथम अभ्यास करणारानें असा राग करून अभ्यास केला असतां तो राग होईल व कानास गोडही लागेल; पण प्रचारांत असा राग कोणी गात नाहींत, एवढ्यावरून असे राग होत नाहींत असें मात्र समजूं नये. **मध्यम, पंचम**विहीन राग जसा होतच नाहीं, तशी स्थिति धैवत, **निषाद**हीन रागाची समजूं नये.

तात्पर्य, नवीन **राग** करणारांनीं **स, र, ग, मा, प; व स, र, ग ध, न** या व कोमल तीव्र भेदानें यांच्या प्रमाणेंच होणाऱ्या रचना सोडून निरनिराळे राग करावे. यासंबंधानें पुष्कळ लिहावयासारखें आहे; पण तें प्रस्तुत स्थळीं योग्य होणार नाहीं.

वर दिलेल्या नियमांप्रमाणें बारा स्वरांपैकीं पांच किंवा अधिक स्वरांची कोणतीही रचना केली असतां तीस **राग** अशी संज्ञा आहे. त्या रचनेंत **वादी** स्वर कोणता ठेवावा व **संवादी** स्वर कोणता ठेवावा हें समजण्याकरितां **वादी-संवादीचा** नियम देऊन कोष्टक दिलें आहे. **रागास** आरंभ कोठें करावयाचा व **राग** कोठें संपवावयाचा याचेही नियम दिले आहेत. रागासंबंधीं एवढ्या गोष्टी समजल्या म्हणजे रागाचें **आरोहण** व **अवरोहण** समजलें असें होईल.

आतांपर्यंत **शुद्ध, मिश्र** वगैरे रागांचीं उदाहरणें देतांना **आरोहण-अवरोहण** ह्मणून जे स्वर दिले आहेत, ते स्वर त्या त्या

रागाच आरोहण–अवरोहणांत आहेत इतकेंच समजावें. ते स्वर तशाच क्रमानें गाइले असतां रागाचें पूर्ण स्वरूप प्रगट होणार नाहीं. त्या ठिकाणीं रागाचें आरोहण--अवरोहणाचें खरें मर्म सांगितलें असतां सपुरिक झालें नसतें व नीटसें समजलेंही नसतें ; ह्मणून नुसते स्वर देऊन काम भागविलें आहे.

रागाची रचना केल्यावर त्याच्या मुख्य अंगाचें ज्ञान झालें पाहिजे ; यास्तव रागाचें आरोहण व अवरोहणाचें वास्तविक लक्षण सांगतों.

केवळ **आरोहण** व **अवरोहण** या शब्दांपासून नीच स्वरांपासून उंच स्वरांकडे जाणें व उंच स्वरापासून नीच स्वराकडे येणें, असा बोध होतो.

अमुक एक रागाचें आरोहण–अवरोहण असें ह्मटल्यानें त्या रागाला लागणाऱ्या स्वरांचें आरोहण–अवरोहण असा उघड अर्थ दिसतो; परंतु मागें असें सांगितलें आहे कीं, कांहीं रागांना तेच स्वर लागतात, पण वादी स्वर भिन्न ठेविल्यानें निरनिराळे राग होतात. तेव्हां असें दिसून येईल कीं, केवळ स्वरांचे आरोहण–अवरोहणानें रागाचें स्वरूप व्यक्त होणार नाहीं, ह्मणून रागाचें आरोहण–अवरोहण दाखवितांना त्यामध्यें **वादी–संवादी** स्वरांचें लक्षण स्पष्ट दिसलें पाहिजे. तात्पर्य, केवळ आरोहण–अवरोहणामध्यें **राग** ओळखितां आला पाहिजे.

रागाचे स्वरूपांस वादी स्वर कारणीभूत होतो व वादीचें प्राबल्य दाखविण्यासाठीं त्याचें उच्चारण अधिक असावें लागतें; त्यापेक्षां संवादीस्वराचें उच्चारण कमी असावें लागतें; संवादीपेक्षां अनुवादी स्वरांचें उच्चारण कमी असावें लागतें; रागाला प्रारंभ

वादीस्वरापासून करावयाचा असतो व रागाचा शेवटही पण वादी-स्वरावरच करावयाचा असतो.

यावरून असें दिसून येईल कीं, ज्या स्वरापासून रागाला आरंभ होतो, त्याच स्वरापासून रागाचे आरोहणास सुरुवात केली पाहिजे, व ज्या स्वरावर राग संपवावयाचा असतो, त्याच स्वरावर रागाचें अवरोहण संपलें पाहिजे; शिवाय आरोहण–अवरोहणांत वादी--संवादीस योग्य तितकें उच्चारण (लांबविणें) दिलेंच पाहिजे.

ज्या स्वरापासून रागाचे आरोहणाला सुरुवात केली असेल, त्या स्वराच्या दुप्पटीच्या स्वरापर्यंत आरोहण करावें, व तेथूनच अव-रोहण करावें. उ०–सपासून आरोहणास सुरुवात केली असेल तर स़ (दुप्पटीचा) वर आरोहण संपवावयाचें. रपासून केलें तर ऱ्वर संपवावयाचें. गपासून केलें तर ग़वर संपवावयाचें. इ. इ.

अशा लक्षणांनींयुक्त जें आरोहण व अवरोहण त्यासच रागाचें आरोहण–अवरोहण ह्मणावें.

उ० :–राग हिंडोल.

आरोहण :–**स, ग, म, ध, न, स़ ;**

अवरोहण :–**स़, न, ध, म, ग, स ;**

असें मागें दिलें आहे; परंतु आतां सांगितल्याप्रमाणें हिंडोल रागाचें आरोहण–अवरोहण मांडूं.

स, ग, म, ध, न या स्वररचनेंत वादी--संवादीच्या कोष्टकानुरूप **ग** वादी व **न** संवादी ही एक जोडी, व **न** वादी व **म** संवादी अशी दुसरी जोडी सांपडते. वादी स्वर बदलल्यानें रागही बदलतो, असें **सारंग** व **सुहा** या रागांचें उदाहरण देऊन सांगितलेंच आहे. यांवरून **स, ग, म, ध, न** या स्वररचनेंत दोन राग होतात

हें सिद्ध होतें. अशा प्रकारें एकाच स्वररचनेंत जेव्हां अनेक राग होतात, तेव्हां त्या स्वररचनेस त्या रागांचा **थाट** असें ह्मणतात.

---

१ **थाट** हा शब्द वाद्याचे परिभाषेंत उपयोगांत आणतात. **थाट** ह्मणजे रागाला लागणाऱ्या स्वरांमध्यें पडद्याची किंवा तारांची व्यवस्था करणें. पडद्यांचे थाटास **सारिका थाट** असें ह्मणतात. तारांच्या थाटास **तंत्री थाट** असें ह्मणतात.

थाटाचे प्रकार दोन आहेत. १ **चलथाट**. २ **अचलथाट**.

वाद्यामध्यें १२ ही स्वरांचे पडदे बांधिले असले ह्मणजे त्याला **अचलथाट** ह्मणतात.

वाद्यामध्यें बारा स्वरांचे पडदे न बांधल्या कारणानें रागाला लागणाऱ्या स्वरांकरितां पडदे सरकावून व्यवस्था करावी लागते, तेव्हां त्यास **चलथाट** ह्मणतात.

चलथाट पुष्कळ होतात. **थाट** ही शिक्षकांनीं विद्यार्थ्यांस शिकविण्यास सोईचें पडावें ह्मणून केलेली व्यवस्था होय. एकंदर स्वर बारा आहेत. व त्या सर्व स्वरांची माहिती झाली पाहिजे; पण प्रथम शिकणारास एकदम बारा स्वर शिकविणें सयुक्तिक होणार नाहीं; शिवाय लागोपाठ तेच स्वर कोमल व तीव्र घ्यावयाचा नाहीं, ह्मणून प्रथम **स, र, ग, म, प, ध, न, सं** हे नेहमींचे स्वरसप्तक शिकवावें ह्मणून एवढेच पडदे वाद्याला बांधिले. व ह्या व्यवस्थेस **थाट** असें नांव दिलें. हे स्वर समजल्यावर रागाचे नियमाप्रमाणें या स्वरांपैकीं पांच, सहा, सात स्वर घेऊन होणारे राग शिकविले व त्या रागांना त्या थाटांत होणारे राग ह्मटले. इतका अभ्यास झाल्यावर मग वाद्यांस कोमल **ऋषभाचा** पडदा बांधिला व दुसरा थाट केला. (तीव्र **ऋषभा**चा पडदा अलिकडे सरकावून कोमल **ऋषभ** केला) व या **थाटांत** होणारे रागांचा अभ्यास करविला. अशाच रीतीनें कोमल **गांधार**, तीव्र **मध्यम** वगैरे बारा स्वरांची माहिती होण्याकरितां निरनिराळे थाटांची योजना केली, हें लक्ष्यांत येईल.

वीणेच्या एका तारेस **स** कल्पून तिच्या आधारानेंच बाकीच्या तारांची व पडद्यांची व्यवस्था करावी लागते.

प्रचारांत **तंत्री थाट** दोन प्रकारचे आहेत.

पहिल्या प्रकारांत १ ली तार **मं**, २ री **सं**, ३ री **पं** व ४ थी **सं** अशी व्यवस्था केली आहे.

दुसऱ्या प्रकारांत १ ली तार **सं**, २ री **पं**, ३ री **सं** व ४ थी **पं** अशी व्यवस्था केली आहे.

कोणताही प्रकार घेऊन पडद्यांची व्यवस्था केली व मग जरी तारांचा थाट बदलला, तरी पडद्यांचें स्थान बदलावें लागत नाहीं, हें लक्ष्यांत ठेवावें. अशानें पडद्यावर उत्पन्न होणाऱ्या स्वरांचें नांव मात्र बदलेल. ह्मणजे पहिल्या प्रकारच्या थाटांत ज्या पडद्याला **स**चा पडदा ह्मणूं, त्याच पडद्याला दुसऱ्या प्रकारच्या थाटांत **प**चा पडदा ह्मणावें लागेल. याच रीतीनें निरनिराळ्या स्वरांत तारा मिळविल्या तर निरनिराळे **तंत्रीथाट** होतील.

प्रचारांत **हिंडोल** या नांवानें प्रसिद्ध असलेल्या रागांत **ग** वादी व **न** संवादी मानिला आहे. तेव्हां आपणांसही **हिंडोल** रागाचें आरोहण–अवरोहण लिहितांना **ग** वादी व **न** संवादी घेतला पाहिजे. **न** वादी व **म** संवादी घेतल्यानें **हिंडोल** या नांवानें प्रसिद्ध असलेला राग होणार नाहीं ; परंतु दुसराच राग होईल.

असो, **हिंडोल** रागांत **ग** वादी आहे, तेव्हां **हिंडोल** रागास आरंभ **ग** पासून करावयाचा, व **हिंडोल** रागाचा शेवट **ग** वरच करावयाचा. **वादी** स्वरास इतर स्वरांपेक्षां जास्त उच्चारण द्यावयाचें. तेव्हां **ग**चें उच्चारण किती असावें असा प्रश्न उपस्थित होतो. सर्वांत कमी उच्चारणाचे, ह्मणजे **अनुवादी** स्वर, यांना सर्वांत कमी ह्मणजे प्रत्येकास एकच वेळ उच्चारण देऊं; त्यापेक्षां **संवादी** स्वरास जास्त ह्मणजे आणखी एकवेळ = २ वेळ उच्चारण देऊं; संवादी स्वरांपेक्षां वादी स्वरास अधिक ह्मणजे आणखी एकवेळ = ३ वेळ उच्चारण देऊं, ह्मणजे बरोबर हिशेब जमला.

१ नुसतें आरोहण–अवरोहणामध्यें रागाचें स्वरूप दाखवावयाचें ह्मणजे **वादी** स्वर ३ वेळां उच्चारावा (इतर स्वरांपेक्षां तिप्पट वेळ लांबवावा). **संवादी** स्वर दोन वेळां उच्चारावा व **अनुवादी** स्वर एकवेळ उच्चारावा असें स्थूलमानानें ठरलें.

अशाप्रकारें **हिंडोल** रागाचें आरोहण–अवरोहण मांडूं—

आरो० :–**ग, ग, ग, म, ध, न, न, स़, ग़, ग़, ग़** ;

अवरो० :–**ग़, ग़, ग़, स़, न, न, ध, म, ग, ग, ग** ;

हें आरोहण व अवरोहण निरनिराळें मांडून दाखविलें आहे ; परंतु रागाचें आरोहण--अवरोहण एकदम सांगतांना–

ग, ग, ग, म, ध, न, न, स़, ग़, ग़, ग़,

स़, न, न, ध, म, ग, ग, ग , असें समजावें.

या रीतीनें रागाचें आरोहण–अवरोहणांत रागाचें स्वरूप दाखविण्यास संस्कृत परिभाषेंत **मूर्छना** या शब्दाची योजना केली आहे.

संस्कृतग्रंथांत मूर्छना लिहितांना वादी–संवादी स्वरांवर जास्त उच्चारण दिलें नाहीं; तेव्हां त्या पद्धतीप्रमाणें हिंडोलाची मूर्छना मांडून दाखवितों.

राग **हिंडोल.**

आरोहण–**ग, म, ध, न, स़, ग़;**

अवरोहण–**ग़, स़, न, ध, म, ग;**

दोन्दी एकदम–**ग़, म, ध, न, स़, ग़, स़, न, ध, म, ग;**

रागाचे जितके प्रकार आहेत, तितक्याच प्रकारच्या मूर्छना आहेत हें ध्यानांत ठेवावें. **हिंडोल** या रागास ५ स्वर लागतात व त्या रागाचा आरंभ **गांधारावर** आहे, तेव्हां **हिंडोलाच्या मूर्छनेस गांधाराची औडव मूर्छना** ह्मणतात. अशाच रीतीनें प्रत्येक रागाचे लक्षणावरून त्याच्या **मूर्छनेची** जाती लक्ष्यांत येईल.

उ०–राग **देस.**

आरोहण–**र, मा, प, न, स़, ऱ;**

अवरोहण–**ऱ, स़, ना, ध, प, मा, ग, र;**

याला ऋषभाची **औडव संपूर्ण मूर्छना** ह्मणतात.

दिलेल्या नियमानुसार रागाची रचना केल्यावर त्याची **मूर्छना** मांडावी ह्मणजे नवीन राग विसरण्याची भीती नाहीं.

उ०–राग **हिंडोल–स, ग, म, ध, न, स़;** या पांच स्वरांच्या रचनेचें नांव आपणास ठाऊक नाहीं असें समजा, तर आपल्या टिपण-वहींत या रागाचा उल्लेख कसा करावा हें सांगतों.

स, ग, म, ध, न, सृ यांत सर्व स्वर तीव्र आहेत. र व प हे स्वर मुळींच नाहींत; गांधाराची मूर्छना व **औडव** जाति यांत हिंडोलाची सर्व माहिती आली; मग एखाद्याला **हिंडोल** हें नांव ठाऊक असो वा नसो; त्याला आपण सांगितलें कीं, **गांधार मूर्छना, औडव जाति, र, प, विहीन सर्व तीव्र-स्वरांनीं युक्त** असा राग वाजवावा किंवा गावा, ह्मणजे तो जो राग गाईल किंवा वाजवील तो राग **हिंडोलच** होईल.

संस्कृतग्रंथकारांनीं हीच माहिती ध्यानांत रहाण्यास सुलभ पडावें ह्मणून छंदोबद्ध लिहिली आहे. ज्याना साधेल त्यांनीं आपण केलेल्या रागांची माहिती तशी लिहावी.

उ०—हिंडोलो रिपहीनःस्यात् गांधारादिक मूर्छनः ॥
तीव्र स्वरैर्युतो ज्ञेयः सज्जनानंद दायकः ॥ १ ॥

रागाचें नुसतें नांव सांगून फलाणा राग गा, अशी फर्मास करून मग तुमचा व आमचा राग जमत नाहीं असें म्हणण्यापेक्षां वर सांगितल्याप्रमाणें माहिती सांगून गाण्यास सांगितलें ह्मणजे गाण्यावाजविण्याच्या मजलसीमध्यें नेहमीं होणाऱ्या भानगडी मिट-तील. अशी माहिती दिली असतां वाटेल तो राग बरोबर वाजवितां येणें याचेंच नांव शास्त्राची माहिती असणें होय. घोटून घोटून तयार केलेले कांहीं विवक्षित राग गातां किंवा वाजवितां येणें म्हणजे शास्त्राचें किंवा कलेचें ज्ञान आहे असें ह्मणतां येणार नाहीं. आह्मी म्हणतों त्याप्रमाणें फर्मास केली असतां गाण्याचें किंवा वाजविण्याचें कौशल्य ज्यांच्या अंगीं असेल त्यांना हा राग जुना व हा राग नवा हा भेदच उरणार नाहीं. तात्पर्य, गायनवादनाची एक नियमित पद्धति आहे. त्या पद्धतीप्रमाणें नियमबद्ध अशी कोणतीही स्वररचना गातांवाजवितां आलीच पाहिजे. या पद्धतीची ओळख व्हावी

म्हणून प्रस्तुत पुस्तक तयार केलें आहे. या पुस्तकांत दिलेल्या नियमाबरहुकूम अभ्यास व मेहनत करणारास गायन–वादनाची माहिती मिळून त्याचे बुद्धीसही गती मिळेल व आजपर्यंत आंधारांत चांचपडत जाणाऱ्याप्रमाणें त्यांचा अभ्यास न होतां, ते क्रमानें एक एक पायरी वर चढून या शास्त्रांत पारंगत होतील यांत संशय नाहीं.

सध्याचा भाग ह्मणजे गायनशास्त्राचा ' ओनामा ' होय. या भागाचा जे अभ्यास करितील, त्यांच्याकरितां पुढील भागांत सर्व प्रकारची शास्त्रीय माहिती व संस्कृत ग्रंथांचें रहस्य देण्याचा विचार आहे.

स, ग, म, ध, न, स़ या स्वररचनेंत **ग** वादी व **न** संवादी धरून एक राग, व **न** वादी व **म** संवादी धरून एक राग, असे दोन राग होतात. तेव्हां या रागांना नांवें कोणतीं द्यावीं असा प्रश्न उपस्थित होतो. प्रचारांत फारसे राग नसल्यामुळें रागरचनेच्या नियमाप्रमाणें होणाऱ्या प्रत्येक रागास नांव सांपडेलच असें नाहीं. कित्येकांस नांवें सांपडतील तर कित्येकांस सांपडणार नाहींत; अशा रागांस आपल्या पसंतीप्रमाणें नांवें दिलीं तरी चालेल. नांवावर फारसें महत्त्व नाहीं. मुद्दा एवढाच कीं, जो राग तयार होईल तो नियमाबरहुकूम गाइला किंवा वाजविला पाहिजे. **मधु माधवी** या नांवावर रागाचें माधुर्य अवलंबून नाहीं. प्रचारांत उपलब्ध असलेल्या नांवांतसुद्धां बरीच विसंगतता आहे. एकाच स्वररचनेस कोठें **भूप** तर कोठें **मोहन** व कोठें **रेवगुप्ती** असें ह्मणतात. **सारंगास मध्यमावती** असेंही म्हणतात. तात्पर्य, नांवास फारसें महत्त्व न देतां नियमानुसार रागांची रचना करून नियमाप्रमाणें गावें व वाजवावें, ह्मणजे झालें. प्रचारांतील सर्व राग या नियमांत येतातच. आह्मीं दिलेल्या नियमाप्रमाणें राग करून गाणारा, वाजविणारा प्रचारांतील

सर्व रागांत बाकबगार होईल, एवढेंच नव्हे तर, प्रचारांत नसलेल्याही रागांची त्यांस माहिती होईल, हें निर्विवाद आहे.

आपण तयार केलेला राग प्रचारांत प्रसिद्ध आहे असें आढळून येईल, त्या त्या वेळीं प्रचारांतलेंच नांव ध्यानांत ठेवावें. प्रचारांत न आढळणाऱ्या रागास नांवच द्यावयाचें असेल तर प्रचारांतील रागास ज्या पद्धतीनें नांवें दिलीं आहेत त्या पद्धतीनें आपणास योग्य दिसेल तें नांव द्यावें.

रागांच्या सर्व जातींचा पूर्ण विचार केल्यावर प्रचारांतील सर्व रागांचीं नांवें व आरोहण-अवरोहण देण्याचा आमचा विचार आहे.

प्रचारांतील रागांना नांवें कशीं दिलीं आहेत.

१ कांहीं रागांस देवांचीं नांवें दिलीं आहेत;

उ० :-भैरव, भैरवी, इ.

२ कांहीं रागांस ऋतु, वृक्ष वगैरेंचीं नांवें आहेत.

उ० :-वसंत, आम्र, इ.

३ कांहीं रागांस वस्तूंचीं नांवें आहेत.

उ० :-घंटाराग, गुंडराग इ.

४ कांहीं रागांस देशांचीं नांवें आहेत.

उ० :-गुर्जरी, सोरटी, मारवा, इ.

५ कांहीं रागांस रागकर्त्यांनीं आपलीं नांवें दिलीं आहेत.

उ० :-मियाचा मल्हार, मियाची तोडी, हुसेनी कानडा; रामदासी मल्हार, सुरदासी मल्हार, बिलासखानी तोडी, इ. इ.

६ कांहीं राग ज्या काळीं गावयाचे त्या काळाचे अन्वर्थक नांवांनीं युक्त आहेत.

उ० :–मेघमल्हार, दीपक, इ. इ.

७ कांहीं रागांस ज्या दोन रागांच्या मेलनानें तो राग झाला असेल त्या मेलनाचीं दर्शक नांवें आहेत.

उ० :–केदारनाट, हम्मीर नाट, गौड-सारंग, पूर्वी धनाश्री, इ. इ.

८ कांहीं रागांस *स्वरांचीं नांवें आहेत.

उ० :–ऋषभराग, गांधारराग, पंचम राग, हे प्रसिद्ध आहेत व अनुमानावरून मध्यम, धैवत, निषाद हेहि राग असावेत, असें वाटतें.

ताल.

गाण्या-वाजविण्याच्या क्रियेचा काल मोजण्याचें जें प्रमाण (माप) त्याला **ताल** ह्मणतात.

ताल मोजण्याच्या प्रमाणाला **मात्रा** ह्मणतात.

मात्रा आंकड्यांच्या सहाय्यानें बसवितां येतात. जसें :– १, २, ३, ४ हे आंकडे सारख्या अवकाशानें ह्मटले असतां एका आंकड्याच्या उच्चारणापासून दुसऱ्या आंकड्याच्या उच्चारणापर्यंतचा जो अवकाश त्याला **मात्रा** ह्मणावी. हा अवकाश ठेवणें आपल्या खुषीवर आहे.

आघात ह्मणजे टाळी वाजविणें. सुरुवातीच्या आघातास **सम** ह्मणतात.

---

* स्वरांच्या नांवांचा उपयोग केला आहे. पण त्या त्या स्वरांचें प्राबल्य त्या त्या रागांत ठेविलेंच आहे, असा अनुभव प्रचारांत येत नाहीं, ह्मणून नवीन राग करणारांनीं या गोष्टीकडे लक्ष्य द्यावें हें चांगलें.

करपात ह्मणजे टाळी न वाजवितां हात खालीं करणें; कित्येक तालांत **करपात** मुळींच नसतो.

मात्रांमध्यें **आघात** व **करपात** यांची व्यवस्था केली ह्मणजे **ताल** होतो. जसें :—१, २, ३, ४ या चार मात्रा घेऊन त्यांमध्यें पहिल्या मात्रेवर **आघात** (सम), दुसऱ्या मात्रेवर **आघात**, तिसऱ्या मात्रेवर **करपात** व चवथ्या मात्रेवर **आघात**, अशी व्यवस्था केली ह्मणजे हा एक (चार मात्रेचा) **ताल** झाला. याला प्रचारांत **आदिताल** ह्मणतात.

मात्रांमध्यें **आघात** व **करपात** यांची व्यवस्था करितांना प्रत्येक मात्रेवर **आघात** किंवा **करपात** यांपैकीं कांहीं तरी असलाच पाहिजे, असा नियम नाहीं. कांहीं तालांत प्रत्येक मात्रेवर **आघात** किंवा **करपात** यांपैकीं कोणता तरी ठेविलेला आहे, हें **आदितालाच्या** उदाहरणांवरून लक्ष्यांत येईलच. कित्येक तालांत कांहीं मात्रांवर **आघात**, कांहीं मात्रांवर **करपात**, व कांहीं मात्रांवर दोहोंपैकीं एकही न ठेवितां तितक्या मात्रांचा अवकाश जाऊं द्यावयाचा, अशी व्यवस्था केली आहे. उदाहरणार्थ :–१, २, ३, ४, ५, ६, ७ ; सात मात्रांचा एक ताल आहे. यामध्यें अशी व्यवस्था केली आहे कीं, पहिल्या मात्रेवर **आघात** (सम), मग दोन, तीन या मात्रांचा अवकाश तसाच जाऊं देऊन चवथ्या मात्रेवर **आघात** देतात; मग पांचव्या मात्रेचा अवकाश तसाच जाऊं देऊन सहाव्या मात्रेवर **आघात** देतात. व सातव्या मात्रेचा अवकाश तसाच जाऊं देऊन पहिल्या मात्रेवर **आघात** (सम) देऊन पुनः तालाचा आरंभ करितात. अशा रीतीनें तालाच्या सर्व मात्रा संपल्या ह्मणजे पुनः तालास आरंभ करणें ह्मणजे तालाचें **आवर्तन** करणें ह्मणतात. **सरगम--गत--चीज** वगैरे मधील अक्षरांच्या मानानें तालाचीं

आवर्तनें होतील. या उदाहरणांत सांगितलेल्या तालास प्रचारांत **तिवडा** ह्मणतात. यांत **करघाताचा** उपयोग मुळींच नाहीं. अशा प्रकारच्या तालांत मात्रांचा अवकाश जो तसाच जाऊं द्यावयाचा तो नुसते तोंडानें आंकडे म्हणून किंवा हातानें बोटें मोजून जाऊं द्यावा.

मात्रेवर अक्षरांचा हिशेब बसविणें ह्मणजे प्रत्येक मात्रेच्या अवकाशांत किती अक्षरें म्हणावयाचीं हें ज्याचें त्यानें ठरवावें.

मात्रांचें प्रमाण ठरवून त्या प्रमाणांतच सारखा ताल देणें याला **लय** ह्मणतात.

लय तीन प्रकारची आहे.

१ मात्रेला जास्त अवकाश देऊन सावकाश ताल देण्याच्या पद्धतीस **विलंबित लय** ह्मणतात.

२ मात्रेला कमी अवकाश ठरवून जलद ताल देण्याच्या पद्धतीस **द्रुतलय** ह्मणतात.

३ मात्रेला फार जास्तही नाहीं व फार कमी पण नाहीं, अशा प्रकारचा मध्यम अवकाश ठरवून ताल देण्यांच्या पद्धतीस **मध्यलय** ह्मणतात.

प्रचारांत मध्यलयीस **साधारण लय** ह्मणतात व तिच्यावरूनच बाकींच्या लयींचें प्रमाण बसवितात.

मध्यलयींतील मात्रेला जो अवकाश ठरविला असेल त्याच्या निम्पट किंवा कोणत्याही पटीनें तो अवकाश कमी करून त्या प्रमाणानें ताल देण्याच्या पद्धतीस **द्रुतलय** ह्मणतात. बहुशः **मध्यलयीचे** मात्रेचा अवकाश निम्पट किंवा चतुर्थांश करून त्या प्रमाणांत **द्रुतलयीचा** उपयोग करितात, व त्या लयीस अनुक्रमें साधारण लयीची **दुगण** व **चौगुण** असें ह्मणतात.

मध्यलयींतील मात्रेच्या अवकाशाचें प्रमाण दुप्पट, चौपट किंवा कोणत्याही पटीनें करून त्या प्रमाणानें ताल देण्याच्या पद्धतीस **विलंबित लय** ह्मणतात. बहुशः **साधारण लयींतील** मात्रेच्या अवकाशाचें प्रमाण दुप्पट किंवा चौपट करून त्या प्रमाणांत **विलंबित लयीचा** उपयोग करितात; व त्या लयीस अनुक्रमें **साधारण लयीची ठाय व ठायीची ठाय** असें ह्मणतात.

प्रस्तुत पुस्तकाचा अभ्यास करणाऱ्यांस **लयीची** एवढीच माहिती पुरे आहे.

तालाची लेखन–पद्धति.

॥ अशा दोन रेघा देऊन **सम** दाखवावी; ह्मणजे ज्या अक्षरावर **सम** ह्मणजे तालाची सुरुवात असेल त्या अक्षराच्या अलिकडे अशा दोन रेघा लिहाव्या. जसें ॥ **स** ह्मणजे **स**वर तालाची सुरुवात (सम) आहे असें समजावें.

। इला **आघातरेषा** समजावी. या रेषेपुढील अक्षरावर **आघात** आहे असें समजावें. जसें । **स** ह्मणजे सवर आघात (टाळी) आहे असें समजावें.

ॱ ईस **करपात रेषा** समजावी. या रेषेपुढील स्वरावर टाळी न वाजवितां हात खालीं करावा. जसें ॱ **स** ह्मणजे **स**वर हात खालीं करावयाचा.

ताल करण्याविषयीं.

ज्याप्रमाणें आपणांस **राग** करितां येतात त्याप्रमाणेंच **ताल**ही करितां येतात. कोणतीही मात्रांची संख्या घ्यावी, व त्यांमध्यें निरनिराळ्या मात्रांवर **आघात** व **करपात** योजावेत; ह्मणजे निरनिराळे **ताल** होतील. उदाहरणार्थ :–सात मात्रांचे निरनिराळे **ताल** कसे होतात, ते तालाच्या लेखनपद्धतींत लिहून दाखवितों.

॥ १, २, । ३, ४, ५, ६, ७ एक प्रकार.

॥ १, २, । ३, ४, । ५, ६, ७ दुसरा प्रकार.

॥ १, । २, ।॰ ३, ४, । ५, । ६, ।॰ ७ तिसरा प्रकार.

॥ १, ।॰ २, । ३, । ४, ।॰ ५, । ६, । ७ चवथा प्रकार.

इ. इ. इ.

येणेंप्रमाणें आपल्याला वाटतील तितक्या मात्रांचे वाटेल त्या रीतीनें **आघात** व **करपात** यांची व्यवस्था करून **ताल** करितां येतील, हें उघड आहे. आपण केलेल्या तालांत **ठेके**, **पर्ण**, **तुकडे** वगैरे कसे करावे याचा विचार पुढील भागांत करूं.

नमुन्याकरितां प्रचारांतील कांहीं ठळक तालांच्या **मात्रा**—**आघात**—**सम**—व **करपात** लिहून दाखवितों.

आदिताल.

॥ १, । २, ।॰ ३, । ४;

सुरफाक्ता.

॥ १, ।॰ २, । ३, । ४, ।॰ ५;

चौताल.

॥ १, ।॰ २, । ३, ।॰ ४, । ५, । ६;

तिवडा.

॥ १, २, ३, । ४, ५, । ६, ७;

आड्याचौताल.

॥ १, । २, ।॰ ३, । ४, ।॰ ५, । ६, ।॰ ७;

झंपा.

॥ १, २, । ३, ४, ५, ६, ७, । ८, ९, १०;

धमार.

॥ १, २, ३, ४, ५, । ६, ७, ८, ९, १०, । ११, १२, १३, १४;

सवारी.

॥ १, २, ३, । ४, ५, ६, ७, । ८, ९, १०, ११, । १२, १३, १४, १५;

हे व यांशिवाय आणखी कांहीं ताल प्रसिद्ध आहेत, परंतु सामान्यतः **आदिताल** व **चौताल** वगैरे, वर दिलेल्या तालांचा उपयोग करितात. या पुस्तकाचे पुढील भागांत तालासंबंधीं संपूर्ण माहिती देण्याचा आमचा विचार आहे. रागाचे प्रकरणाप्रमाणेंच तालाचें प्रकरण फार व्यापक आहे. रागाच्या विस्ताराप्रमाणेंच तालाचा विस्तार करितां येतो, ह्मणून तालाच्या जाति, प्रस्तार, खंडमेरू व त्यांचा उपयोग यांचा विचार निराळाच केला पाहिजे.

संस्कृत ग्रंथांत तालाची माहिती पुष्कळ दिली आहे, परंतु त्या माहितीप्रमाणें तालाचा उपयोग करून गाणारे व वाजविणारे मुळींच आढळत नाहींत असें ह्मटलें तरी चालेल. धृवपद गातांना तालाच्या सर्वांगांचा उपयोग करण्याची कला लुप्त झाली आहे असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. यास्तव, पुढील भागांत धृवपद वगैरेबद्दल विचार करितांना तालांच्या सर्वांगांचा विचार करूं.

' सरगम ' विषयीं.

राग करण्याच्या नियमानुसार कोणतेही पांच, सहा, सात स्वर घेतले असतां राग होतो, असें मागें सांगितलेंच आहे.

राग तयार केल्यावर त्या रागाचा उपयोग गाण्या-वाजविण्यांत करावयाचा.

गाण्याच्या दोन तऱ्हा आहेत. एक साधें व दुसरें अलंकारयुक्त गाणें.

साधें गाणें दोन प्रकारचें आहे.

पहिला प्रकार :—रागाला लागणारे स्वरांमध्यें स्वरांचें उच्चारण करून (सा, रे, इ. इ. गातांना उच्चार कसे करितात हें पहिलें

पृष्ठावर दिलेंच आहे.) तालांत गाणें. हें गाणें अर्थविरहित असतें. यालाच ' **सरगम** ' (स्वरावर्त) गाणें ह्मणतात.

दुसरा प्रकारः– ' **सरगम** ' च्या स्वरांक्षरांचे उच्चारणाऐवजीं त्याच स्वरांमध्यें कवित्व गाणें.

वाद्यांमध्यें फक्त ध्वनि उत्पन्न करण्याचें साधन असल्यामुळें त्यामध्यें फक्त स्वर वाजवितां येतात ; अक्षरें उत्पन्न होत नाहींत.

' सरगम ' करण्याविषयीं.

' **सरगम** ' करावयाची असल्यास प्रथम असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, ' **सरगम** ' मध्यें कमींत कमी कितीं अक्षरें असलीं पाहिजेत. सर्वांत कमी स्वरांचा राग ह्मटला म्हणजे पांच स्वरांचा राग होय. या रागाचें स्वरूप व्यक्त होण्यास **वादी** व **संवादी** स्वरास ज्यास्त उच्चारण दिलें पाहिजे. तें कमींत कमी घ्यावयाचें ह्मणजे ज्याअर्थीं **वादी, संवादी, अनुवादी** या तीन प्रकारचें स्वरांचा उपयोग रागांत होतो, त्याअर्थीं सर्वांत कमी उच्चारणाचे **अनुवादी** स्वरात एकवेळ उच्चारण देऊं. **संवादी** स्वरास त्यापेक्षां अधिक ह्मणजे दोन वेळां उच्चारण देऊं; व **वादी** स्वरांस त्याहीपेक्षां अधिक ह्मणजे तीन वेळां उच्चारण देऊं.

अनुवादी स्वर **औडव** रागांत तीन असतात म्हणून तीं तीन अक्षरें ; **संवादी** स्वरांचें उच्चारण दोन वेळां ह्मणून तीं दोन अक्षरें; **वादी** स्वरांचें उच्चारण तीन वेळां ह्मणून तीं तीन अक्षरें ; अशीं एकंदर आठ अक्षरें **आरोही** झालीं. यांत अशींच आठ अक्षरें **अवरोही** मिळविलीं कीं एकंदर सोळा अक्षरें होतात.

प्रत्येक **औडव** रागांत अशा रीतीनें सोळा अक्षरें मांडिलीं कीं, त्या रागाची पहिली ' **सरगम** ' झाली. यावरून लक्ष्यांत येईलच कीं, ' **सरगम** ' मध्यें कमींत कमी सोळा अक्षरें असलीं पाहिजेत.

उदाहरण :-हिंडोल रागाची सोळा अक्षरी ' **सरगम** ' मांडा-वयाची आहे तर---

स, ग, ग, ग, म, ध, न, न, स, न, न, ध, म, ग, ग, ग; भूप रागास स, र, ग, प, ध, हे स्वर लागतात. तर भूप रागाची ' **सरगम** ' मांड :--स, र, र, र, ग, प, ध, ध, स, ध, ध, प, ग, र, र, र; (यांत र वादी व ध संवादी आहे.) रागाला आरंभ **वादी** स्वरापासून करावा, असें आम्हीं सांगितलें आहे. पण सपासून आरंभ केला तरी चालेल, असेंही सांगितलें आहे. प्रस्तुत उदाहरणांत सवर आरंभ केला आहे. रागांचे स्वर चुणल्याबरोबर त्यांची तशीच '**सरगम**' लिहितां यावी म्हणून अशी योजना केली आहे.

रागापासून अशा तऱ्हेच्या प्रथम होणाऱ्या ' **सरगम** ' लिहिणें कठिण नाहीं. यांत केवळ **आरोही-अवरोही** स्वर यथाक्रम घेतले आहेत. आतां रागाचा विस्तार करून ' **सरगम** ' करावयाच्या. **विस्तार** म्हणजे स्वरांमध्यें मागें पुढें जाणें. (विस्तार कसा करावा हें परिशिष्ट (२) मध्यें सांगितलें आहे). विस्तारानें केलेल्या ' **सरगम** ' मध्यें **आरोहण-अवरोहण**प्रमाणें स्वर यथाक्रम आलेच पाहिजेत, असें नाहीं. प्रस्तारभेदानें त्यांच्या क्रमांत थोडासा फेर झाला तरी चालेल. आमच्या नियमाप्रमाणें रागाची **मूर्छना** मांडली असतां **वादी** स्वरापासून आरंभ होणारी प्रथम ' **सरगम** ' होईल, हें उघड आहे.

' सरगम ' करण्याचे नियम.

१ ज्या तालांत ' **सरगम** ' करावयाची असेल त्या तालांतील मात्रांच्या अनुरोधानें ' **सरगम** ' चीं अक्षरें ठरवावीं.

२ ज्या रागांत '**सरगम**' करावयाची असेल त्या रागांतील स्वराक्षरांचे, एक अक्षरी, दोन अक्षरी, तीन अक्षरी, चार अक्षरी, पांच अक्षरी, सहा अक्षरी, सात अक्षरी असे तुकडे पाडावे.

(औडव रागांत सर्वांत मोठा तुकडा पांच अक्षरी, षाडव रागांत सर्वांत मोठा तुकडा सहा अक्षरी, संपूर्ण रागांत सर्वांत मोठा तुकडा सात अक्षरी होईल हें सांगावयास नको).

३ विस्ताराच्या नियमाप्रमाणें प्रत्येक तुकड्याचे प्रकार मांडावे.

(एक आंकड्यापासून सात आंकड्यापर्यंत आंकड्यांचे तुकडे पाडून त्या प्रत्येक तुकड्याचा विस्तार मांडून एक तक्ता तयार करून ठेवावा, म्हणजे वरचेवर विस्तार मांडण्याची जरूर पडणार नाहीं. कारण, तयार केलेल्या रागाच्या स्वराक्षरांवर आंकडे लिहिले कीं, आपला तक्ता नेहमीं उपयोगी पडेल.)

४ जितक्या अक्षरांची 'सरगम' करावयाची असेल त्यांतून कांहीं अक्षरें वेगळीं काढून ठेवावीं. कारण, आपणांस **वादी–संवादीस** जास्त उच्चारण द्यावयाचें आहे, त्याकरितां या अक्षरांचा उपयोग करावा. नेहमींच अक्षरें काढून ठेविलीं पाहिजेत असें नाहीं. प्रकार घेऊन **सरगम** करितांना **वादी–संवादीस** जास्त उच्चारण मिळेल अशा तऱ्हेनें प्रकार घेण्याची व्यवस्था करितां आली तर निरनिराळीं अक्षरें काढून ठेवण्याची जरूर नाहीं; नेहमीं अशा तऱ्हेची व्यवस्था होणार नाहीं म्हणून अक्षरें राखून ठेवण्याची युक्ती सांगितली आहे.

५ ज्या स्वरावर जास्त उच्चारण द्यावयाचें तो स्वर उच्चारणाला लागणारें कालाइतका लांबविला तरी चालेल. उ० :–**ग**ला तीन वेळां उच्चारण द्यावयाचें असल्यास **ग**, **ग**, **ग** असें तीन वेळां उच्चारण दिलें किंवा **ग**–०–० असा **ग** लांबविला तरी चालेल. कारण हिशेबांत दोहोंची किंमत तीन अक्षरांइतकी आहे. (–०) हें चिन्ह स्वर लांबविण्याचें आहे. म्हणून राखून ठेविलेलीं अक्षरें **वादी–संवादीस** मिळवितांना **ग**, **ग**, **ग** अशा तऱ्हेनें उच्चारणार्थीं

मिळवावीं किंवा **ग**–०–० पूज्यें देऊन तितक्या अक्षरांच्या काला-इतका तो स्वर लांबवावा. अशीही योजना करावी. एका पूज्याची किंमत एका अक्षराइतकी समजावी.

६ प्रथम ज्याच्या आरंभीं **स** किंवा **वादी** स्वराक्षर असेल असा एक प्रकार घ्यावा. दुसरा कोणता तरी तुकडा घेऊन आरंभ केला तर होतां होईतों झटकन ज्यांत **वादी** स्वर असेल असा तुकडा घेण्याची खबरदारी घ्यावी. मग निरनिराळ्या तुकड्यांचे प्रकारांतून लहान, मोठे तुकडे घेऊन इष्ट ती अक्षरांची संख्या भरावी. मात्र शेवटील तुकड्याचें शेवटचें अक्षर **वादी** स्वराक्षर असावें.

७ आपण तयार केलेल्या '**सरगम**' मध्यें ज्या ठिकाणीं **वादी** स्वराक्षर व **संवादी** स्वराक्षर आलें असेल अशा कांहीं ठिकाणीं राखून ठेविलेल्या अक्षरांची संख्या भरून काढावी. अक्षरांची वाटणी करितांना कांहीं ठिकाणीं तरी संवादी स्वराच्या संख्येपेक्षां **वादी** स्वरांची संख्या जास्त असावी. मागें स्थूलमानानें सांगितल्याप्रमाणें प्रत्येक ठिकाणीं **वादी** स्वर तीन वेळां व **संवादी** स्वर दोन वेळां आलाच पाहिजे असा नियम समजूं नये. एखादे ठिकाणीं **वादी**-वर चार, पांच किंवा अधिक अक्षरांइतकें उच्चारण देतां येईल; व एखादे ठिकाणीं दोनच वेळां किंवा क्वचित् एकवेळही उच्चारण दिलें तरी चालेल. मुख्य मुद्दा एवढाच कीं, जागोजागीं वादी स्वरांचें प्राबल्य दाखविलें पाहिजे. त्यांत सुरुवातीला तर वादीचें प्राबल्य दाखविणें जरूर आहे.

८ जुन्या चिजांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यावरून असें दिसतें कीं, सवर किती उच्चारण द्यावें याचा नियमच नाहीं. कित्येक चिजांत सवर इतकें उच्चारण दिलेलें आढळतें कीं, ऐकणारांससुद्धां

कंटाळा येतो. स हा स्वर बाकीच्या सहा स्वरांचा जनक आहे. म्हणून सवर जास्त उच्चारण दिल्यानें रागाची छाया बिघडणार नाहीं. परंतु आपण नवीन रचना करितांना हा दोष होतां होईतों टाळावा.

९ अशा रीतीनें तयार झालेली '**सरगम**' तालांत लिहावी व गावी. तालाच्या मात्रांच्या अनुरोधानें '**सरगम**' चीं अक्षरें ठरवावीं असें सांगितलें. परंतु अक्षरें घेतल्यावर त्यांच्या अनुरोधानें **ताल** ठरविला तरी हिशेब एकच होतो. ओढाताण करून विवक्षित तालांत गावयाची खटपट नको, म्हणून तसें सांगितलें. जो ताल सहज लागण्यासारखा असेल त्या तालांत लिहावी हें चांगलें.

वरील नियमांच्या स्पष्टीकरणार्थ **हिंडोल** रागांत एक '**सरगम**' करून दाखवितों. प्रथम असें ठरवूं कीं, **आदितालांत '** **सरगम**' करावयाची. आदितालाच्या मात्रा चार आहेत. तेव्हां त्यांच्या अनुरोधानें आपणास करावयाची ती **सरिगम** बत्तीस अक्षरी करूं.

हिंडोल रागांच्या स्वराक्षरांचे (**स, ग, म, ध, न**) एक अक्षरी, दोन अक्षरी, तीन अक्षरी, चार अक्षरी व पांच अक्षरी तुकडे पाडूं.

एक अक्षरी तुकडे :—स; ग; म; ध, न;

दोन अक्षरी तुकडे :—सग; सम, सध, सन; गम, गध; गन; मध, मन, धन;

तीन अक्षरी तुकडे :—सगम, सगध, सगन, समध, समन, सधन, गमध, गमन, गधन, मधन;

चार अक्षरी तुकडे :—सगमध, सगमन, सगधन, समधन, गमधन;

पांच अक्षरी तुकडा एकच :—सगमधन.

यांचा विस्तार.

एक अक्षरी विस्तार :—स; ग; म; ध; न;

दोन अक्षरी विस्तार.

सग; सम; सध; सन; गम; गध; गन; मध; मन; धन;
गस; मस; धस; नस; मग; धग; नग; धम; नम; नध;

तीन अक्षरी विस्तार.

सगम,	सगध,	सगन,	समध,	समन,	सधन,
गसम,	गसध,	गसन,	मसध,	मसन,	धसन,
समग,	सधग,	सनग,	सधम,	सनम,	सनध,
मसग,	धसग,	नसग,	धसम,	नसम,	नसध,
गमस,	गधस,	गनस,	मधस,	मनस,	धनस,
मगस,	धगस,	नगस,	धमस,	नमस,	नधस,

गमध,	गमन,	गधन,	मधन,
मगध,	मगन,	धगन,	धमन,
गधम,	गनम,	गनध,	मनध,
धगम,	नगम,	नगध,	नमध,
मधग,	मनग,	धनग,	धनम,
धमग,	नमग,	नधग,	नधम,

चार अक्षरी विस्तार.

सगमध,	सगधम,	सधमग,	गमधस,
गसमध,	गसधम,	धसमग,	मगधस,
समगध,	सधगम,	समधग,	गधमस,
मसगध,	धसगम,	मसधग,	धगमस,
गमसध,	गधसम,	धमसग,	मधगस,
मगसध,	धगसम,	मधसग,	धमगस.

येथें फक्त ' सगमध ' या तुकड्याचा विस्तार लिहिला आहे. याच धोरणानें बाकींच्या चार अक्षरी तुकड्यांचा विस्तार करावा. व याच रीतीनें 'सगमधन' या पांच अक्षरी तुकड्याचा विस्तार १२० करावा. पहिला तुकडा १ ' सगमधन ' व शेवटील १२० वा तुकडा ' नधमगस ' हा होईल.

प्रथम ज्याचे आरंभीं **ग** आहे, असा चार अक्षरी ' **गमधन** ' हा घेतला. हा प्रथम तुकडा. नंतर याचाच चोविसावा ' **नधमग** ' हा तुकडा घेतला. नंतर ' **सधन** या तीन अक्षरी तुकड्याचा तिसरा तुकडा ' **सनध** ' हा घेतला. नंतर ' **समधन** ' या चार अक्षरी तुकडयाचा एकोणिसावा तुकडा मधनस हा घेतला. नंतर ' **सग** ' या दोन अक्षरी तुकडयाचा ' **गस** ' हा दुसरा तुकडा घेतला. नंतर ' **सन** ' या दोन अक्षरी तुकडयाचा ' **नस** ' हा दुसरा तुकडा घेतला. नंतर गमधन या चार अक्षरी तुकडयाचा पुनः पहिला ह्मणजे हाच तुकडा घेतला. नंतर ' **गमध** ' या तीन अक्षरी तुकडयाचा सहावा तुकडा ' **धमग** ' हा घेतला. आतां एकंदर घेतलेले तुकडे मांडतों.

१ **गमधन**, २ **नधमग**, ३ **सनध**, ४ **मधनस**, ५ **गस**, ६ **नस**, ७ **गमधन**, ८ **धमग**.

हीं एकंदर अक्षरें सव्वीस झालीं. बाकी सहा अक्षरें राहिलीं. त्यांपैकीं चार अक्षरें वादी स्वर **ग** याला जेथें **ग** आला असेल तेथें तेथें वाटून दिलीं व संवादी स्वर **न** याला २ अक्षरें वाटून दिलीं; तेव्हां—

१ **गमधन**–यांत पहिल्या **ग**ला दोन **ग** मिळविले ह्मणजे, **गगगमधन** असा तुकडा झाला.

५ तुकडा **गस** हा आहे. याला दोन **ग** मिळविले तेव्हां **गगगस** असा तुकडा झाला.

६ तुकडा **नस** याला एक **न** मिळविला तेव्हां **ननस** असा तुकडा झाला.

७ **गमधन** या तुकड्यास एक **न** मिळविला तेव्हां **गमधनन** असा तुकडा झाला.

आतां एकंदर बत्तीस अक्षरें झालीं तीं हीं :—

गगग मधन, नधमग, सनध, मधनस, गगगस, ननस, गमधनन, धमग ; यांत सप्तकाच्या व तालांच्या खुणा घालून लिहितों. म्हणजे ही '**सरगम**' गाण्यास व वाजविण्यास तयार झाली. स्वरांत अंतर नसावें ही गोष्ट मनांत ठेविली असतां सप्तकांची व्यवस्था करणें फार सोपें जाईल.

॥ग ग ग म । ध न न ध ⁱ म ग स नं । धं मं धं नं ॥स ग ग ग । स नं नं स ⁱ ग म ध न । न ध म ग.

जुन्या '**सरगम**' चें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें असतां आह्मी ह्मणतों त्याचें सत्यत्त्व दिसून येईल. उदाहरणादाखल **कल्याण** रागांतील एक जुनी '**सरगम**' लिहून तीविषयीं विचार करूं. ही '**सरगम**' प्रचारांत फारच प्रसिद्ध आहे. किंबहुना ज्याला ह्मणून गाण्यावाजविण्याचें थोडेसें ज्ञान आहे, त्याला ही '**सरगम**' ठाऊक आहेच असें म्हटलें तरी चालेल.

राग कल्याण—सरगम.

स र ग, प म ग र, ग म प ध नि, ध प म, ध प म ग, प म ग र.

वरील '**सरगम**' मध्यें **कल्याण** रागाच्या स्वरांच्या विस्तारापैकीं कोणते प्रकार घेतले आहेत ते मांडूं.—

१ **सरग**—हा **सरग** या तीन अक्षरी तुकड्याचा पहिला प्रकार.

२ **पमगर**—हा **रगमप** या चार अक्षरी तुकड्याचा चोविसावा प्रकार.

३ **गमपधन**—हा **गमपधन** या पांच अक्षरी तुकड्याचा पहिला प्रकार.

४ **धपम**—हा **मपध** या तीन अक्षरी तुकड्याचा सहावा प्रकार.

५ **धपमग**—हा **गमपध** या चार अक्षरी तुकड्याचा चोविसावा प्रकार.

६ **पमगर**—हा **रगमप** या चार अक्षरी तुकड्याचा चोविसावा प्रकार.

येणेंप्रमाणें सहा तुकडे घेऊन ही **सरगम** केली आहे. या सहा तुकड्यांच्या अक्षरांची संख्या तेवीस आहे. पण गातांना हीं ३२ अक्षरी ह्मणून गातात. ह्मणजे कांहीं अक्षरांना जास्त लांबवून उरलेल्या ९ अक्षरांची भरती करितात. जसें :—पहिल्या तुकड्यांतील **स**च्या मागें व पुढें एकेक अक्षर; व **ग**च्या पुढें (वादी) पांच अक्षरांइतका विराम घेतात (स्वर लांबवितात). दुसऱ्या तुकड्यांतील **ग**चे पुढें एक अक्षर व **र**चे पुढें एक अक्षर, अशीं ३२ अक्षरें पुरीं करितात.

या ‘ **सरगम** ’ मध्यें **संवादी** स्वराचें लक्षण मुळींच दिसून येत नाहीं. असें असून ही **सरगम** सर्वमान्य कशी झाली ही एक आश्चर्य करण्याजोगी गोष्ट आहे. याच रीतीनें सर्व जुन्या कवित्वाची तपासणी केली असतां असें दिसून येतें कीं, बहुशः **वादी** स्वराकडेच लक्ष्य दिलें असतें. **संवादी**चें लक्षणानें युक्त अशीं कवित्वें फारच थोडीं आढळतात. नवीन **सरगम--गत--कवित्वें** वगैरे करणारांनीं **वादी--संवादीच्या** महत्त्वाकडे लक्ष्य पुरविणें फार चांगलें. या

" **सरगम** " मध्यें **पमगर** येथेंच शेवट झाला असें भासतें. पुढील सर्व तिचा विस्तार आहे. ही गोष्टसुद्धां विचारांत घेण्याजोगी आहे.

गती.

१ **सरगमला** एक विशिष्ट स्वरूप देऊन तिचा वाद्यांत वाजविण्याकडे उपयोग करितात व तिला **गत** म्हणतात.

२ **गतीची** परिभाषा ठराविक आहे. गतीमध्यें ज्या बोलांचा उपयोग करितात ते बोल :–

दा–दिड–डा–ड् हे होत.

३ **दा–दिड–डा** या प्रत्येक बोलाची किंमत एक अक्षराइतकी समजावी.

४ ड्–या बोलाची किंमत अर्ध्या अक्षराइतकी समजावी.

५ **दा**–हा बोल सुलट आघातानें वाजवावा.

६ **डा**–हा बोल उलट आघातानें वाजवावा.

७ **दिड**–हा बोल एकदम उलटसुलट आघातानें वाजवावा.

८ **ड्**–हा अर्धा बोल उलट किंवा सुलट आघातानें वाजवून लागलींच झटकन् याच्या पुढील बोल वाजवावा.

९ ड्–हा अर्धा बोल जेव्हां **डा**चे पुढें येईल, तेव्हां सुलट आघातानें वाजवावा. (**डा ड्**).

१० **ड्**–हा अर्धा बोल जेव्हां **दा**चे पुढें येईल, तेव्हां उलट आघातानें वाजवावा. (**दा ड्**).

११ आपण तयार केलेली **सरगम** तालांत लिहावी व तिच्याखालीं गतीचे पारिभाषिक बोल लिहावे. व या बोलांच्या स्वरूपांत **सरगम** वाजविली कीं **गत** होईल. हे बोल लिहितांना कानाला गोड लागतील व **सरगम**च्या अक्षरांच्या संख्येला मिळते येतील असे असावे.

१२ आपल्यास ज्या तालांत **गत** करावयाची आहे त्या तालाच्या मात्रांस अनुसरून आपण केलेल्या **सरगम**चीं अक्षरें आहेत कीं नाहीं हें पहावें; व कांहीं अक्षरें जास्त झालीं असल्यास गतीचे बोल खालीं लिहितांना कांहीं अक्षरांखालीं ड् हें अर्धे अक्षर लिहून—म्हणजे त्या त्या स्वरांची किंमत अर्ध्या अक्षराची करून सर्व अक्षरें तालास मिळतीं करावीं. जसें **आदितालांत गत** करावयाची आहे, व आपण तयार केलेल्या **सरगम**मध्यें ३३ अक्षरें आहेत, तर **सरगम**ला ताल लावितांना दोन अक्षरांचे पाय मोडून (ड् अर्धा बोल खालीं लिहून) ३३ अक्षरांची किंमत ३२ अक्षरांइतकी करावी व तालास मिळतें द्यावें.

१३ **दा** व **डा** हा फरक आमच्यामतें नाहीं; परंतु प्रचारांत हा भेद मानिला असल्यामुळें याचा विचार केला आहे.

सरगमच्या अक्षरांखालीं गतीचे पारिभाषिक बोल लिहिल्यावर ती आमच्या लेखनपद्धतीप्रमाणें लिहावीं.

गतीची लेखनपद्धति.

दा किंवा **डा**—नुसतें स्वराक्षर जसें—स; **दिड**—दोन अक्षरें जोडलेलीं—जसें—<u>सस</u> <u>सर</u> इ. ड्—स्वराक्षराचा पाय मोडलेला जसें—स् र् ग् इ०.

१ **सरगम**च्या ज्या स्वराक्षराखालीं **दा** हा बोल लिहिला असेल, किंवा **डा** हा बोल लिहिला असेल, तें स्वराक्षर **गत** लिहितांना तसेंच लिहावें.

२ ज्या अक्षराखालीं दिड हा बोल लिहिला असेल तें स्वराक्षर दोनदां लिहून खालीं रेघेनें जोडावें. जसें :—<u>सस</u> इ०.

३ ज्या अक्षराखालीं ड् हा बोल लिहिला असेल त्या अक्षराचा पाय मोडावा.

४ दोन अक्षरें अर्धी करणें किंवा तीं रेघेनें एकत्र जोडून त्यांना दिड हें स्वरूप देणें एकच होय. जसें–सर, गम, मध इ.

अशा रीतीनें लिहिण्यांत, **सरगम** लिहून पुनः खालीं गतीचे बोल लिहिण्याचे श्रम वाचतील. या पद्धतीप्रमाणें सरगमला गतीचें स्वरूप देऊन **गती** लिहाव्या.

सरगमच्या अक्षरांखालीं **गतीचे** पारिभाषिक बोल आपल्या कानाला गोड लागतील असे व अक्षराला मिळते येतील असे लिहावे.

प्रथमच **गत** तयार करणाऱ्याकरितां दोन-चार नमुने (प्रचारांतील) लिहून दाखवितों.

१ दिड–दा–दिड–दा–डा–दा–दा–डा ;
यांपैकीं वाटेल त्या बोलापासून सुरुवात केली व बाकीच्या बोलांचें उच्चारण केलें तरी एकच प्रकारचा नमुना होईल.

२ दा-डा-दा-डा-दा-डा-दा-डा-दा-दा-ड्-दा-दा-डा-दा-डा-दा-डा-दा-डा-डा-दा-दा-डा-दा-दिड-दिड-दिड-दा-ड्दा-ड्दा.

३ दा-दिड-दिड-दा-ड्दा-दा-डा-दा-दिड-दिड-दिड-दा-ड्दा-ड्दा-दा-ड्दा-डा-दा-ड्दा-डा-दाड-दाडा-दिड–दिड-दिड-दा–ड्दा–ड्दा.

४ दा-रा-दिरदा–दिरदा–०–रा-दा–०–दिरदा–रा–दा-रा-दिरदा रा-दा-दिरदा–दिरदा–दा–रा–दा–दिर–दिर–दा–र दा-र्.

५ दिरदा–दिरदा–रा-दा-दा-र -दा-रा-दिर-दिर-दिर-दा-र्दा-र्दा-दा-दिर-दिर-दा-र्दार्दा–दिर-दिरदा र्दार्–दिर -दा–र्दार्.

या सरगममध्यें बत्तीस अक्षरें आहेत व सुरुवातीच्या गवर सम ठेविली आहे. आतां तिच्याखालीं दा, दिड, दा, डा, इ० बोल लिहितों.

॥ ग ग ग म। ध न न ध ꠰ म ग स नं।
दा दा डा दिड दा दिड दा डा दा दा डा दिड
धं मं धं नं॥ स ग ग ग। स नं नं स
दा दिड दा डा दा दा डा दिड दा दिड दा डा
꠰ ग म ध न। न ध म ग
दा दा डा दिड दा दिड दा डा

हीच गत आमच्या लेखनपद्धतीप्रमाणें ह्मणजे दा, दा, डा वगैरे बोल खालीं न लिहितां लिहून दाखवितों.

॥ ग ग ग मम। ध नन न ध ꠰ म ग स नंनं। धं मंमं धं नं
॥ स ग ग गग। स नंनं नं स ꠰ ग म ध नन। न धध म ग

उत्तम गवय्ये बजवय्ये दा, डा, दिड, ड् यांच्या ऐवजीं दा, रा, दिर, र् असा उच्चार करितात. कारण, असें केल्यानें उच्चारास मृदुत्व येऊन गतींचा उपयोग गाण्याकडे करितां येतो. व अशी गाइलेली गत तराण्यासारखी भासते. तात्पर्य, रागाची रचना करून सरगम करावी व गावी. सरगम खालीं दा, दिड, दा, डा इ. बोल लिहून अथवा आहेत अशी कल्पना करून वाजवावे; ह्मणजे गती होतील. दा, दिड, दा, डा ह्मणजे तारांवर आघात; मग तो उलटा असो वा सुलटा असो, त्यांत विशेषसा फरक नाहीं. बीनावर गत वाजविली तर त्यांत जुने पद्धतीप्रमाणें डकार मुळींच नाहीं; असें असून दा, दिड, दा, डा साफ ऐकूं येतात व गत बरोबर वाजल्याप्रमाणें भास होतो. तेव्हां द व ड यांत फरक कसा होतो, हें नीटसें

समजत नाहीं; ह्मणून आम्ही दा, दिड, दा, डा इ. बोल काढून टाकिले आहेत. सांगावयाचें ह्मणून इतकेंच कीं, तारांवर आघात करून विशेष प्रकारचा ध्वनि उत्पन्न करावयाचा. तथापि, जर कोणास फरक समजत असेल, अथवा होतो असें वाटत असेल, त्यांनीं खुशाल फरक मानून **गती** वाजवाव्या. त्यांस ही नवीन रीति उपयोगी पडेल.

‘ सरगम ’ करण्याची दुसरी पद्धति.

मागें सांगितल्याप्रमाणें **सरगम** करितां येतील ; परंतु दुसरी सोपी व फारच उत्कृष्ट पद्धति आहे. तिच्या सहाय्यानें वाटेल त्या **रागांत** सहज **सरगम** करितां येतील.

नियम–रागाला लागणाऱ्या **स्वरांमध्यें** खंड पडल्यानें माधुर्याची हानि होते व क्वचित् प्रसंगीं रागाचें स्वरूपही बदलतें; ह्मणून मुख्य **नियम** समजावा कीं, होतां होईलों स्वरांमध्यें खंड पडूं देऊं नये; ह्मणजें **स्वर** क्रमानें मागें किंवा पुढें घेत जावे. **राग** संपवावयाचा त्याच स्वरावर **सरगम** संपवावी. ज्या स्वरापासून **सरगम**ची सुरुवात करावयाची असेल, त्या स्वराच्या पुढचा किंवा मागचा एक स्वर घेऊन पुनः उलटावें व क्रमानें रागाला लागणारे सर्व स्वर घेऊन पुनः क्रमानें सुरुवातीच्या स्वरावर **सरगम** संपवावी. ह्मणजे पुष्कळ **सरगम** सहज होतील. पुढचा किंवा मागचा जो स्वर घेतला असेल त्या स्वरापर्यंतच उलटावें. अशानें रागाला लागणारे सर्व स्वरांचा समावेश होईल.

स्पष्टीकरण.

राग हिंडोल :–स, ग, म, ध, न, स; थाट

गं मं धं नं स ग म ध न स ग एवढ्या स्वरांचा विचार करून दाखवितों. गपासून सुरवात करावयाची, तेव्हां असे दिसेल कीं,

गच्या पुढें मकडे जाण्यास एक मार्ग व गच्या मागें सकडे जाण्यास एक मार्ग, असे दोन मार्ग आहेत. दोन्ही मार्गांचा उपयोग करूं. प्रथम गकडून मकडे जाऊन पुनः उलटून धंपर्यंत जाऊं व क्रमानें गवर संपवूं, ह्मणजे रागाचे सर्व स्वर सरगममध्यें येतील.

१ ग म ग स नं धं नं स ग ;

दुसरी सरगम करितांना गच्या पुढचे दोन स्वर घेऊन उलटून रागाचे सर्व स्वर घेऊन क्रमानें गवर संपवूं.

२ ग म ध म ग स नं स ग;

अशाच प्रकारानें गच्या पुढील तीन, चार, पांच, स्वर घेत जाऊन सरगम करूं.

३ ग म ध न ध म ग स ग;

४ ग म ध न सं न ध म ग;

५ ग म ध न सं गं सं न ध म ग.

येथपर्यंत गच्या पुढचा एक एक स्वर मिळवीत सरगम केल्या, आतां गच्या मागचा एक एक स्वर मिळवीत सरगम करूं.

१ ग स ग म ध न ध म ग;

२ ग स नं स ग म ध म ग;

३ ग स नं धं नं स ग म ग;

४ ग स नं धं मं धं नं स ग;

५ ग स नं धं मं गं मं धं नं स, ग;

येणेंप्रमाणें वाटेल त्या रागांत सरगम करणें मुळींच कठीण पडणार नाहीं. या सरगममध्यें ज्या स्वरांची पुनरावृत्ती झाली आहे, ती केवळ स्वरांच्या क्रमानें स्वर घेण्यापुरतीच झाली आहे. याशिवाय याच सरगममध्यें शोभेल व कानाला गोड लागेल अशा रीतीनें स्वरांची पुनरावृत्ती केल्यानें मोठमोठ्या सरगम होतील हें उघडच आहे.

या पद्धतीनें केलेल्या **सरगम** अगदीं बरोबर, उत्कृष्ट व सशास्त्र होतात.

स्वरांमध्यें खंड पाडूं नये असें सांगितलें, परंतु प्रथम सांगितलेल्या पद्धतीनें केलेल्या **सरगमां**तील स्वरांमध्यें खंड पडण्याचा संभव आहे, तथापि यामुळें त्या **सरगम** चुकीच्या व टाकाऊ होतील असें समजू नये. कारण, जरी त्या खडे सुरांत कानास गोड लागल्या नाहींत, तरी त्यांच्यांतील खंड **अलंकारीक** स्वरानें भरून काढला ह्मणजे त्या बरोबर होतील; इतकेंच नाहीं, पण विशेष गोडही लागतील. अलंकाराचें स्पष्टीकरण अद्याप झालें नाहीं; ह्मणून ही दुसरी पद्धती सांगितली. याच पुस्तकांत सोप्या गतीस अलंकार कसे लावावे तें दाखविलें आहे. त्याचप्रमाणें **सरगम**मधील खंड अलंकारिक स्वरानें भरून काढून त्यांचा उपयोग करावा.

गतींचा विस्तार.

सरगम करावयाकरितां दोन पद्धती सांगितल्या. **सरगम**खालीं **दा-दिड-दा-डा** हे परिभाषिक बोल लिहून **सरगम**पासून **गती** कराव्या हेंही सांगितलें. सोप्या **सरगम** किंवा **गती** एकाच **रागांत** व **तालांत** पुष्कळ कराव्या व त्यांपैकीं एका **गतीस** मूळ **गत** कल्पून बाकीच्या **गती** तिचा **विस्तार** ह्मणून तिच्यांत मिसळून वाजवाव्या. मूळ मानिलेली **गत** व विस्ताराच्या **गती** यामध्यें फरक एवढाच कीं, मूळ मानिलेली **गत** पुष्कळ वेळां वाजवावी—जसें—प्रथम मूळ मानिलेली **गत** एक दोन वेळां वाजवावी; नंतर विस्ताराची एक **गत** तिच्यांत मिसळावी व ती संपली ह्मणजे पुनः मूळ **गत** वाजवावी व तिच्यांत विस्ताराची दुसरी **गत** मिसळावी व पुनः मूळ गत वाजवावी; अशाच रीतीनें पाहिजे तितक्या **गती** मिसळाव्या. विस्ताराची गत मिसळण्यास प्रारंभ मूळ गतीच्या मुख्य **समे**पासून करावा. गतीचा

विस्तार करावयाची ही तऱ्हा केवळ आमच्या पद्धतीनें **गती** करून वाजविणाराकरितां प्रथम पायरीची होय. गतीचा विस्तार करण्या-संबंधानें ओघानें पुढील भागांत येईलच. **सुमरन तोरा,** किंवा **भज भज भव** असें ह्मणताना **सुमरन तोरा,** किंवा **भज भज भव** हें कडवें ह्मणून–आ ई-ऊ करून **ताना** मारितात व पुनः **सुमरन तोरा** किंवा **भज भज भव** हें कडवें ह्मणतात; व एक **चीज** बराच वेळ गातात; तसेंच मूळ **गत–भज भज भव** किंवा **सुमरन तोरा** याच्या जागीं समजावी व विस्ताराच्या **गती तानांच्या** जागीं समजाव्या. **विस्तार** म्हणजे = वाढवून वाजविणें–**गतीमध्यें** दुसऱ्या **गती** मिसळणें–किंवा **गतीमध्यें**–गतींचें लहान लहान **भाग** मिसळणें यांस गतींचा विस्तार **करणें** ह्मणतात; या लहान भागांस प्रत्येकीं **तुकडा** ह्मणतात; रागाला लागणारे स्वरांच्या प्रस्तारांतील प्रकारांना द्रा-दिड-दा-डाचें स्वरूप दिलें कीं **तुकडे** होतील.

प्रथम एका **रागांत** व **तालांत** चार गती करून त्यांपैकीं एकीस **मूळ गत** कल्पून तिच्यांत बाकीच्या तीन **गती** मिसळून दाखवितों व नंतर विस्ताराच्या व तुकड्यांच्या दुसऱ्या तऱ्हांचा विचार करूं.

सरगम करावयाची दुसरी पद्धति सांगितली त्यावेळीं हिंडोल रागाच्या दहा **सरगम** करून दाखविल्या आहेतच. त्यांपैकीं पहिल्या चार सरगमच्या चार **गतीं आदितालांत** करून एका **गतीस** मूळ गत कल्पून बाकीच्या तीन **गती** तिच्यांत मिसळून दाखवूं.

नमुना १ ला—ग, म, ग, स, नं, धं, नं, स, ग यांत वादी-संवादी स्वरांना जास्त उच्चारण देऊन पुनः सरगम मांडली–

ग ग ग म ग ग ग स नं नं धं नं नं स ग ग;

अशीं १६ अक्षरें झालीं. शेवटच्या गच्यापुढें एकच ग मिळविला. प्रत्येक ठिकाणीं वादीस दोन व संवादीस एक मिळविलाच पाहिजे असा नियम नाहीं. आपणास **आदितालांत** गत करावयाची आहे. **आदितालाच्या मात्रा** चार आहेत म्हणून आपल्या गतींतील अक्षरांची संख्या चाराची **पट** असली पाहिजे. यावरून असें लक्ष्यांत ठेवावें कीं, अशी संख्या नसेल या बेतानें **वादी-संवादी**-स्वराक्षरें मिळवावीं. **हिंडोलांत गवर** राग संपवावयाचा आहे व **गत समेवर** संपवावी म्हणून पहिल्याच गवर सम ठेवूं; म्हणजे या सरगमखालीं

दिड-दा-दिड-दा-डा-दा-दा-डा (+ over दा) हे बोल अशा तऱ्हेनें लिहूं कीं, खूण केलेला दा (समेचा) पहिल्या गखालीं येईल.

॥ ग ग ग म । ग ग ग स । ° नं नं धं नं
दा दा डा दिड दा दिड दा डा दा दा डा दिड

नं स ग ग
दा दिड दा डा

हीच गत आमच्या लेखनपद्धतीप्रमाणें.

॥ ग ग ग मम । ग गग ग स ° नं नं धं नंनं । नं सस ग ग ।

नमुना २ रा :–ग, म, ध, म, ग, स नं, स, ग; यांत **वादी संवादी** स्वरांना जास्त उच्चारण देऊन पुनः **सरगम** मांडूं—

ग, ग, ग, म, ध, म, ग, ग, ग, स, नं, नं, स, ग, ग, ग ;

ही **सरगम** तालांत लिहून आमच्या लेखनपद्धतीप्रमाणें :–

॥ ग ग ग मम । ध मम ग ग ° ग स नं नंनं । स गग ग ग

ही दुसरी गत झाली.

नमुना ३ रा :–ग, म, ध, न, ध, म, ग, स, ग ; यांत **वादी-संवादी** स्वराक्षरें मिळवून–

ग, ग, ग, म, ध, न, न, ध, म, ग, ग, ग, स, ग, ग, ग;

ही सरगम तालांत लिहून आमच्या लेखनपद्धतीप्रमाणें

॥ ग ग ग मम । ध नन न ध ° म ग ग गग । स गग ग ग

ही तिसरी गत झाली.

नमुना ४ था :–ग, म, ध, न, स़, न, ध, म, ग; यांत वादी, संवादी स्वराक्षरें मिळवून

ग, ग, ग, म, ध, न, न, स़, न, न, ध, म, ग, ग, ग, ग;

ही सरगम तालांत लिहून आमच्या लेखनपद्धतीप्रमाणें

॥ ग ग ग मम । ध नन न स़ ° न न ध मम । ग गग ग ग

ही चवथी गत झाली.

येणेंप्रमाणें चार गती झाल्या. यांपैकीं पहिली गत मूळ गत मानून तिच्यांत पुढील तीन गती मिसळून दाखवितों.

गत १ ली.

॥ ग ग ग मम । ग गग ग स ° नं नं धं नंनं । नं सस ग ग

याप्रमाणें गत दोन तीन वेळां वाजवून तिच्यांत दुसरी गत मिसळावी, व पुनः हीच गत वाजवून तिसरी गत मिसळावी व पुनः हीच गत वाजवून चवथी गत मिसळावी; म्हणजे तीन तुकडे झाले. या गतीची सुरुवात समेवर आहे व मिसळावयाच्या गतींची सुरुवात समेवरच आहे. म्हणून हें मिसळणें फारच सोपें पडतें. नेहमीं गत मिसळणें ती समेपासून मिसळतात. विशेष जाणते लोक समेपासून किंवा कालापासून गत मिसळतात. ज्यांचा अभ्यास जास्त झाला असेल ते वाटेल त्या ठिकाणापासून तुकडे मिसळूं शकतात. वाटेल त्या ठिकाणापासून गत कशी मिसळावी याचें एक उदाहरण दाखवितों.

॥ ग ग ग मम । ग गग ग स ॰। नं नं धं नंनं । नं ससग ग

ही आपली **मूळ गत** आहे. आतां इच्यांत मध्येंच कोठून तरी दुसरी **गत** मिसळूं. प्रथम सर्व **गत** एक दोन वेळां वाजवावी. व पुढें ज्या ठिकाणापासून तुकडा घ्यावयाचा असेल तितकीच **गत** वाजवावी व तुकड्याची गत मिसळावी व तुकडा संपला ह्मणजे उरलेली **मूळ गत** वाजवावी. जसें :—

॥ ग ग ग इतकीच मूळ गत वाजवून पुढें **तुकडा** घ्यावयाचा आहे तर या पुढें दुसरी **गत**—

॥ ग ग ग मम । ध मम ग ग ॰। ग स नं नंनं । स गग ग ग

मिसळली ह्मणजे पहिल्या ॥ ग ग ग एवढाच भाग मिळून

॥ ग ग ग ग । ग ग मम ध ॰। मम ग ग ग । स नं नंनं स

॥ ग ग ग ग येथें मिसळावयाची **गत** संपली. तेव्हां मूळ उरलेली **गत** यापुढें वाजवावी.

मम । ग गग ग स ॰। नं नं ध नंनं । नं सस ग ग

ह्मणजे **तालाला** मिळती येईल.

हे जे वर नमुने करून दाखविले, या वेगळाल्या **गती** नसून वास्तविक एकाच **गतीचे प्रकार** आहेत, हें स्वरांच्या सारखेपणावरून सहज लक्ष्यांत येईल. कोणत्याही **रागा**मध्यें एका स्वरापासून आरंभ करून क्रमानें एक एक स्वर मागें किंवा पुढें जाऊन रागामध्यें गत कशी वाजवावी हें पूर्णपणें समजावें ह्मणून हीं **उदाहरणें** करून दाखविलीं आहेत. पहिली **गत** मूळ कल्पून तिच्यांत दुसरी, तिसरी व चवथी गत मिसळावी ह्मणून सांगितलें; परंतु, दुसरी, तिसरी व चवथी या **गती** व पहिली **गत** जवळ जवळ सारखीच आहे, असें असतां या **गती** मिसळून दाखविण्याचा उद्देश एवढाच

र्की, **गत** कशी मिसळावी हें आह्मांला दाखवावयाचें आहे. आह्मीं निरनिराळ्या **गती** मिसळून दाखविल्या असल्या, परंतु आह्मीं केलेल्या गतीवर अवलंबून न राहतां ज्याच्या त्यानें गती करून मिसळाव्या, हें चांगलें. कशा मिसळाव्या हें आह्मीं दाखविलेंच आहे. तात्पर्य, अशा रीतीनें गत वाजविण्याचा पूर्ण अभ्यास झाल्यावर आयत्या वेळीं कोणतेही स्वर घेऊन त्यामध्यें गती वाजविण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं. वाटेल त्या स्वरापासून गत सुरू करून एक एक स्वर मागें पुढें मिळवीत गेल्यानें गत बराच वेळ वाजवितां येऊन रागाचें स्वरूपही लक्ष्यांत येईल. गती, **तराण्याच्या** धर्तीवर गाइल्यानें किंवा **दा—दिर—दिर**च्या ऐवजीं **ना—दिर—दिर** वगैरे परिभाषा वापरल्यानें वाटेल तितके **तराणे** गातां येतील. उत्तम **तंतकाराला तराण्यांची** तूट नसते, यांतील मर्म हेंच होय.

वादी,संवादी स्वराक्षरें मिळविल्यावर **सरगम**चीं अक्षरें मोजावीं व प्रत्येक मात्रेस चार अक्षरें या हिशेबानें **सरगम**च्या अक्षरांत किती मात्रा होतात तें पहावें, व त्या मानानें सहज जो ताल लागेल त्या तालांत लिहून **गत** तयार करावी. प्रत्येक मात्रेस चार अक्षरें दिलींच पाहिजेत असें नाहीं. वाटेल तितकीं अक्षरें मात्रेस ठेवणें हें आपल्या खुषीचें काम आहे; परंतु प्रथमतः सोपें पडावें ह्मणून चार अक्षरांचा सामान्य नियम सांगितला आहे. एखादे वेळीं आपण केलेल्या **सरगम**मध्यें कांहीं अक्षरें तालाच्या हिशेबानें जास्त आहेत असें वाटल्यास **सरगम**च्या कांहीं अक्षरांचे पाय मोडून त्यांची किंमत अर्ध्या अक्षरा इतकी करावी; व गतींत अशीं अक्षरें एकास एक जोडून त्यांना दिडचें स्वरूप द्यावें. जसें **गम**, **मध**, **धन** इ. इ. सारांश, आपणास हवी ती अक्षरांची संख्या करावी.

सरगमच्या अक्षरांमध्यें अक्षरांची पुनरावृत्ति केल्यानें गत

वाटेल तितकी मोठी करितां येईल. जसें **ग म ग स नं धं नं स ग** या पहिल्या नमुन्यांत एकंदर नऊ अक्षरें आहेत. यामध्यें फारसा खंड न पडेल अशा तऱ्हेनें अक्षरांची आवृत्ति करून संख्या वाढवितों.

ग म ग स नं धं नं स नं धं मं धं नं स ग हीं पंधरा अक्षरें झालीं. यांत **वादी–संवादी** स्वराक्षरें मिळवूं. **ग ग ग म ग ग ग स नं नं धं नं स नं धं मं धं नं नं स ग ग ग. वादी–संवादीचें** लक्षण कायम राहील या बेतानेंच अक्षरें मिळविलीं आहेत. हीं अक्षरें चोवीस झालीं. येणेंप्रमाणें वाटेल तितक्या अक्षरांची **सरगम व गत** करितां येईल. या **सरगम**मध्यें प्रथमच सहा **ग** आले आहेत व शेवटीं पुनः तीन **ग** आले आहेत, तरी कानाला कंटाळवाणें लागण्याचा संभव आहे, ह्मणून स्वराक्षरें मिळवितांना असें न होईल याबद्दल खबरदारी घ्यावी. ही गोष्ट लक्ष्यांत यावी म्हणून मुद्दाम वरच्या प्रमाणें **सरगम** करून दाखविली. आतां हींच अक्षरें (**ग**) कमी करतों. प्रथमचेच दोन **ग** कमी करतों ह्मणजे रागास बाध येणार नाहीं. कारण, पुनः **म**च्या पुढें तीन **ग** आले आहेत. हे कमी केलेले **ग** पुढें कोठें तरी दुसरीं दोन अक्षरें वाढवून भरून काढूं.

ग म ग ग ग स नं नं धं नं स नं नं धं मं धं मं धं नं नं स ग ग ग खूण केलेलीं अक्षरें वाढविलीं आहेत. ही **सरगम** विशेष गोड लागेल. याचप्रमाणें व्यवस्था करून वाटेल तितक्या लहान, मोठ्या **सरगम** व **गती** करितां येतील हें उघड आहे.

गतीचा विस्तार करण्याच्या दुसऱ्या तऱ्हा.

नियम १ ला–**गत** अशा तऱ्हेनें अवगत असली पाहिजे कीं, **गतीच्या** प्रत्येक बोलाचें स्थान अगदीं नजरेसमोर असलें पाहिजे; तरच गतीचा विस्तार करितां येईल. आपण **गत** कोठें सोडिली व

तिची पूर्तता कोठपासून केली पाहिजे, हें ठळकपणें नजरेसमोर असलें पाहिजे. तात्पर्य, गत वाजवून खूप घटाविली पाहिजे.

नियम २ रा—गतीची **ठाय—दुगण—चौगुण** करणें.

नियम ३ रा—**ठाय, दुगुण इ. बोलांचें** मिश्रण करणें.

नियम ४ था—प्रत्येक अक्षराचा हिशेब करणें.

गतीमध्यें ताल देतांना एका आघातापासून दुसऱ्या आघातापर्यंत चार अक्षरें (एक मात्रेला) असा हिशेब ठेविला आहे. समजा, एक मात्रेस एक **सेकंद** लागतो आहे, तरी एका सेकंडांत चार अक्षरें ह्मणावयाचीं व तालाचा आघात एक द्यावयाचा. आतां गतीची **ठाय** करावयाची आहे तरी एका सेकंडांत चाराच्या ऐवजीं दोन अक्षरें ह्मणावयाचीं, परंतु तालाचा ठोका एकच ठेवावयाचा.

ठायीची ठाय करावयाची असल्यास एका सेकंडांत एक अक्षर म्हणावयाचें; परंतु तालाचा ठोका एकच ठेवावयाचा.

दुगण करावयाची असल्यास एका सेकंडांत आठ अक्षरें म्हणावयाचीं, पण तालाचा ठोका एकच असावयाचा.

चौगुण करावयाची असल्यास एका सेकंडांत सोळा अक्षरें ह्मणावयाचीं, पण तालाचा आघात एकच असावयाचा.

अशा प्रकारानें अभ्यास केला कीं, प्रत्येक गतीची **ठाय—दुगुण**, इ. करण्याचा अभ्यास होईल. हा अक्षरांचा हिशेब झाला.

एका **आघातास** चार अक्षरें हें **साधारण लयीचें** मान होय. याशीं सर्व हिशेब मिळता आणावा.

साधारण लयींत गतीचें एक **आवर्तन** होतें.

दुगण केली असतां गतीचीं दोन **आवर्तनें** होतील.

चौगुण केली असतां गतीचीं चार **आवर्तनें** होतील.

ठाय लयींमध्यें **गतींचें** अर्धे **आवर्तन** व तालाचें एक **आवर्तन** होईल.

ठायीच्या ठायींत गतीचें पाव आवर्तन व तालाचें एक आवर्तन होईल; ह्मणजे **ठायीच्या ठायींत** संपूर्ण गत वाजविण्याला **साधारण** लयीमध्यें होणाऱ्या तालाच्या आवर्तनाच्या **चौपट** आवर्तनें होतील.

अक्षरांचा हिशेब पक्का लक्ष्यांत ठेवावा, ह्मणजे वर लिहिलेल्या पांच लयींचें मिश्रण करणें कठीण जाणार नाहीं.

समजा, गतीचीं सोळा अक्षरें आहेत. यांत प्रत्येक मात्रेस चार अक्षरें या हिशेबानें चार मात्रांत गत संपविणें—**साधारण लय.**

प्रत्येक आघातास (मात्रेस) आठ अक्षरें या हिशेबानें दोन मात्रेंत गत संपविणें—**दुगुण.**

प्रत्येक मात्रेस सोळा अक्षरें या हिशेबानें एक मात्रेंत गत संपविणें—**चौगुण.**

प्रत्येक मात्रेस दोन अक्षरें या हिशेबानें आठ मात्रांत गत संपविणें—**ठाय.**

प्रत्येक मात्रेस एक अक्षर या हिशेबानें सोळा मात्रांत गत संपविणें ह्मणजे **ठायीची ठाय** होय.

प्रत्येक मात्रेमधील आवकाश मात्र सर्वत्र सारखाच असला पाहिजे.

आदितालांत समेपासून पुन्हा **समेपर्यंत** (एक आवर्तन) चार मात्रा होतात. ह्मणून चाराचा हिशेब सांगितला आहे.

गतीचीं अक्षरें व तालाच्या **मात्रा** या हिशेबानें हें प्रमाण फिरवावें.

ठाय व **ठायीची** ठाय या दोन **लयींचा** उपयोग **अलंकारिक** गतींमध्यें करणें विशेष सोयीचें (रंजन करणारें) आहे.

लयीचें मिश्रण.

गतीचीं पहिलीं बारा अक्षरें साधारण लयींमध्यें वाजवावींत व शेवटच्या चार अक्षरांच्या वेळीं, पांच, सहा, सात, आठ किंवा अधिक अक्षरें भरून तालाचा ठोका पूर्ण करणें. अथवा शेवटील चार अक्षरें दोन वेळां वाजविणें पण तालाचा ठोका मात्र एकच असला पाहिजे.

गतीचीं आठ अक्षरें साधारण लयींत वाजवून बाकीच्या अक्षरांची संख्या वाढवून तालाचे ठोके पूर्ण करणें;

गतीचीं चार अक्षरें साधारण लयींत वाजवून बाकीच्या अक्षरांची संख्या वाढवून तालाचे ठोके पूर्ण करणें.

अक्षरांच्या संख्येच्या मानानें स्वर बदलून अक्षरांची संख्या भरावी. कारण, जर आपली गत सोळा अक्षरीं असेल, व तिच्यांतील बारा अक्षरें चवथ्या ठोक्याला द्यावयाचीं आहेत, तर आपल्यापाशीं गतीचीं चार अक्षरें शिल्लक आहेत; पण ही (८) संख्या भरून काढण्यास रागाला लागणारे स्वरांपैकीं जवळपासचीं चार अक्षरें त्यांत मिळवावीं व त्यांनाही दा-दिड-दा-डाचें स्वरूप द्यावें. अथवा दुसरीं अक्षरें न मिळवितां तींच चार अक्षरें दोनदां वाजविलीं तरी चालेल. तात्पर्य, दुगुण, चौगुण, ठाय वगैरे लयींचें मिश्रण करून वाजविलें तरी तालांत मात्र चुकूं नये म्हणजे झालें.

नमुन्याकरितां गतीच्या पांच लयींचीं उदाहरणें.

साधारणलय-

॥ ग ग ग मम । ग गग ग स ॰ नं नं धं नंन । नं सस ग ग

दुगुण-

॥ ग ग ग मम ग गग ग स । नं नं धं नंन नं सस ग ग.

चौगुण–

॥ ग ग ग मम ग गग ग स नं नं धं नंनं नं सस ग ग

ठाय–

॥ ग ग । ग मम ० ग गग । ग स ॥ नं नं । धं नंनं ० नं सस । ग ग

ठायीची ठाय–

॥ ग । ग ० ग । मम ॥ ग । गग ० ग । स ॥ नं । नं ० धं । नंनं ॥ नं । सस ० ग । ग

एका गतीचा विस्तार :—ठाय–दुगुण वगैरे लयींमध्यें व लयींचे मिश्रणानें निरनिराळ्या गती व गतीचे लहान भाग मिसळल्यानें पुष्कळ होतो. व गत बराच वेळ वाजवितां येते असें आम्हीं सांगितलें तरी त्याचें एक उदाहरण लिहून दाखवितों. जो हिशेब एका लयीला लावावयाचा, तोच हिशेब सर्व लयींना लावावा, हें सांगावयास नको. हिंडोल रागाची एक गत घेऊन तिच्यामध्यें दुगुण लयीचें मिश्रण कसें करावें तें सांगतों.

गत—राग हिंडोल–ताल–आदि.

॥ ग ग ग मम । ध नन न ध

० म ग स नंनं । धं नंनं नं स

अशी एक गत घेतली. आतां या गतीची दुगुण करावी.

॥ ग ग ग मम ध नन न ध

। म ग स नंनं धं नंनं नं स

० ग ग ग मम ध नन न ध

। म ग स नंनं धं नंनं नं स

आतां हींत दुगुणीचें मिश्रण करूं ह्मणजे प्रथम बारा अक्षरें साधारण लयींत वाजवून शेवटचीं चार अक्षरें दुगुणींत वाजवूं. जसें :— ॥ ग ग ग मम । ध नन न ध ꠰ म ग स नंनं येथपावेतों साधारण लय झाली. आतां शेवटचीं चार अक्षरें दुगुणींत लिहावीं. । धं नंनं नं स धं नंनं नं स ह्मणजे गत बरोबर तालांत येईल.

मागें असें सांगितलें आहे कीं, हीं अक्षरें एका आघातांत दोनदां वाजवावीं किंवा यांत दुसरीं चार अक्षरें मिळवावीं (जवळचीं) तर तसें करूं. ॥ ग ग ग मम । ध नन न ध ꠰ म ग स नंनं इतकी गत वाजवून शेवटच्या आघातास ८ अक्षरें लिहावयाचीं. पैकीं आपलीं चार आहेत. धं नंनं नं स यांत आणखी चार मिळवूं नं नंनं धं स ह्मणजे शेवटले आघातास । ध नंनं नं स नं नंनं धं स अशीं आठ अक्षरें झालीं. प्रस्तार भेदानें हीं अक्षरें बदललीं ह्मणजे खालीं लिहिलेप्रमाणें शेवटचीं आठ अक्षरें (एका आघातास) होतील.

। धं नंनं नं स धं सस नं नं २
। धं नंनं नं स स धंधं नं नं ३
। धं नंनं नं स नं नंनं स धं ४
। धं नंनं नं स स नंनं नं ध ५
। धं नंनं नं स नं धंधं नं स ६

येणेंप्रमाणें शेवटच्या ४ अक्षरांचीं आठ अक्षरें केलीं. आतां पहिलीं आठ अक्षरें साधारण लयींत वाजवून पुढील ४ अक्षरें दुगुणींत घेऊन पुनः शेवटचीं चार अक्षरें साधारण लयींत वाजवावीं. जसें—

॥ ग ग ग मम । ध नन न ध

एवढी गत वाजविली ह्मणजे पुढील चार अक्षरें दुगुणींत–
° म ग स नंनं । म ग स नंनं घेऊन शेवटच्या आत्रातास । धं नंनं नं स घेतला कीं गत बरोबर तालांत येईल. आतां ° म ग स नंनं । म ग स नंनं अशी दुगुण लिहिली, त्याऐवजीं म ग स नंनं याला वरील प्रमाणें निरनिराळीं चार अक्षरें मिळवूं, ह्मणजे पुढीलप्रमाणें प्रकार होतील.

° म ग स नंनं ग म स नंनं २
° म ग स नंनं म स ग नंनं ३
° म ग स नंनं स म ग नंनं ४
° म ग स नंनं ग स म नंनं ५
° म ग स नंनं स ग म नंनं ६
° म ग स नंनं म ग नं सस ७
° म ग स नंनं ग म नं सस ८
° म ग स नंनं म नं ग सस ९
° म ग स नंनं नं म ग सस १०
° म ग स नंनं ग नं म सस ११
° म ग स नंनं नं ग म सस १२
° म ग स नंनं म स नं गग १३
° म ग स नंनं स म नं गग १४
° म ग स नंनं म नं स गग १५
° म ग स नंनं नं म स गग १६

°
। म ग स नंनं स नं म गग १७

°
। म ग स नंनं नं स म गग १८

°
। म ग स नंनं ग स नं मम १९

°
। म ग स नंनं स ग नं मम २०

°
। म ग स नंनं ग नं स मम २१

°
। म ग स नंनं नं ग स मम २२

°
। म ग स नंनं स नं ग मम २३

°
। म ग स नंनं नं स ग मम २४

येणेंप्रमाणें प्रकार झाले; आपण गत वाजवितांना यांपैकीं वाटेल तितके घेऊन गत वाजवावी.

आतां गतीचीं पहिलीं चार अक्षरें साधारण लयींत वाजवून पुढील (चार) अक्षरांची दुगुण करूं व पुढील ८ अक्षरें साधारण लयींत वाजवूं. जसें–

॥ ग ग ग मम हीं अक्षरें साधारण लयींत वाजविलीं व पुढचीं अक्षरें (चार) दुगुणींत। ध नन न ध ध नन न ध वाजवून पुढील आठ अक्षरें साधारण लयींत वाजविलीं म्हणजे गत तालांतच वाजेल. जसें–

॥ ग ग ग मम । ध नन न ध ध नन न ध ।° म ग स नंनं । धं नंनं नं स

आतां दुगुणीच्या अक्षरांत वरील प्रमाणें फेर किती होतो तो पाहूं–

। ध नन न ध न धध न न

याशिवाय आणखी प्रकार शक्य नाहीं, हें लक्ष्यांत येईलच.

याचप्रमाणें पहिल्या चार अक्षरांची दुगुण करून पुढील अक्षरें (१२) साधारण लयींत लिहावीं.

॥ ग ग ग मम ग ग ग मम । ध नन न ध ¦ म ग स नंनं । धं नंनं नं स याही दुगुणींत फक्त ॥ ग ग ग मम म ग ग गग एवढाच प्रकार शक्य आहे.

येणेंप्रमाणें गतींतील कोणत्याही चार अक्षरांची दुगुण करण्याचा विचार झाला. नंतर आठ अक्षरांची–बारा–अक्षरांची दुगुण याच धर्तीनें करावी. सर्व गत दुगुणींत वाजवावी हें मागें सांगितलें आहेच. याच हिशेबानें चौगुण पण करावी. खडे सुरांत वाजविण्याच्या गतींत ठाय व ठायीची ठाय या लयींचा उपयोग करूं नये. कारण, त्यांत अक्षरांवर विराम जास्त द्यावा लागेल, तें कानास गोड लागणार नाहीं. पुढील भागांत या लयींचा उपयोग अलंकारिक गतींच्या प्रकरणांत करूं.

तात्पर्य––गती करून त्यांचा विस्तार वर दाखविलेप्रमाणें करावा. प्रस्तुत पु तकाचा अभ्यास करणारास गतींची एवढी माहिती पुरें आहे. जास्त माहिती योग्य जागीं येईलच.

१ गत वाजवावी.

२ तिच्यांत दुसरी गत मिसळावी.

३ दुगुण ओळी-ओळीनें करीत सर्व गत दुगुणींत वाजवावी.

४ ओळी ओळीनें (४–८–१२–अक्षरांची) चौगुण करीत सर्व गत चौगुणींत वाजवावी.

५ दुगुण अथवा चौगुण ज्या ज्या भागाची करावयाची, त्या त्या भागांत प्रस्तार भेदानें अक्षरांचा फेरबदल करावा.

याशिवाय निराळे तुकडे (विषम लयींत) मिसळणें. **झाला-ठोक** वगैरे प्रकार गतीचा विस्तार करण्याचे आहेत त्यांचा विचार या भागांत केला नाहीं.

अलंकार.

संस्कृत ग्रंथांत **अलंकाराची** व्याख्या दिली आहे ती :- **विशिष्ट वर्णसंदर्भमलंकारः प्रचक्षते** ॥ या व्याख्येपासून जो सरळ अर्थबोध होतो तो न समजल्यामुळें पुष्कळांचा घोंटाळा झालेला दिसतो. **अलंकाराच्या** चार जाती सांगून त्यांचीं उदाहरणें म्हणून जे स्वर दिले आहेत, ते तसेच गाणें म्हणजे अलंकाराचा उपयोग करणें असें त्यांचें मत झालें असावें असें दिसतें. संस्कृत ग्रंथ-कर्त्यांत तरी कोणी ६६, कोणी ६३, कोणी ५६, कोणी २५ व कोणी तर १ अशीं अलंकाराचीं उदाहरणें दिलीं आहेत. याचें कारण प्रस्तार भेदाच्या सहाय्यानें हवे तितके अलंकार करितां येतात. परंतु त्या सर्वांचा समावेश **चार जातींत** होतो. म्हणून त्या चार **जाती** स्पष्ट समजावून सांगितल्यावर एकच उदाहरण दिलें काय किंवा अनेक उदाहरणें दिलीं काय, हिशेब एकच होतो.

आम्हीं **छायालग** रागाची व्याख्या देतांना असें सांगितलें कीं, **छायालग** रागांत कांहीं विशिष्ट स्वरांची **छाया** उपयोगांत आणिली असते, म्हणजे त्या स्वरांवर **उच्चारण** न देतां ते स्वर **आकारांत** घ्यावयाचे असतात. वाद्याचे परिभाषेंत बोलावयाचें म्हणजे ते स्वर **नखीच्या** आघातानें उत्पन्न करावयाचे नाहींत. ते स्वर तार ताणून अथवा बोटें उडवून डाव्या हातानें काढावयाचे असतात. नखीच्या आघातानें किंवा स्वरांवर उच्चारण न देतां काढावयाचे स्वरांस **अलंकारिक स्वर** म्हणतात. अलंकारिक स्वरांचा उपयोग मुख्यतः स्वरांच्यामध्यें पडलेला खंड भरून काढावयाकरितां आहे. शिवाय

रागाला लागणारे स्वरांमध्यें विशेष प्रकारानें **ताना** घेण्यास सुद्धां अलंकार ह्मणतात. आतां हा अर्थ संस्कृत ग्रंथांत दिलेल्या व्याख्येपासून कसा निघतो तें पाहूं.

विशिष्ट—विशेष प्रकारचा.

वर्ण——गाण्याची क्रिया.

संदर्भम्—संबंध.

अलंकारः **प्रचक्षते**—अलंकार ह्मणतात.

गातांना ज्या एका विशेष प्रकारानें स्वरांचा परस्पर संबंध जोडतात त्याला **अलंकार** म्हणतात. **अलंकार**विरहित जें **गाणें** तें **सरगम** गाणें होय. **सरगम**मध्यें जास्त सौन्दर्य आणण्यास **सरगम** मधील प्रत्येक स्वराचा पुढील स्वरांशीं एका विशेष प्रकारच्या पद्धतीनें संबंध जोडणें त्यांस **अलंकार** ह्मणतात.

विशेष स्पष्टपणें सांगावयाचें ह्मणजे कोणत्याही स्वराचा दुसऱ्या स्वरांशीं **आकारानें** अथवा **मेंडेनें संबंध जोडणें** त्यांस **अलंकार** ह्मणतात.

अलंकाराचे भेद.

अलंकाराच्या जाती चार आहेत.

१—**स्थायी** :—स्वरांवर विराम केला असतां (लांबविला अथवा पुनरुच्चारण केलें असतां) **स्थायी** अलंकार होतो.

२—**आरोही**—**आरोहणांत अलंकार** घातला कीं तो **आरोही** अलंकार होतो.

३—**अवरोही** :—**अवरोहणांत** अलंकार घातला कीं तो **अवरोही** अलंकार होतो.

४—**आरोह—अवरोहणाच्या** मिश्रणांत **अलंकार** घातला कीं तो **संचारी** अलंकार होतो.

मुख्यतः **अलंकार** चारच आहेत व त्यांच्या मुळेंच गाण्याचे मुख्य प्रकार चार झाले आहेत. या चार प्रकारांची पूर्ण माहिती झाली कीं, आपणांस पोटभेद ह्मणून वाटेल तितके अलंकार करितां येतील ह्मणून या चार प्रकारांचा विचार करूं. विशेष स्पष्ट समजावें ह्मणून **सतार** किंवा **बीन** यांच्या उदाहरणानें खुलासा करितों.

१—**सतार** किंवा **बीन** घेतला असतां पडद्यावर तार ताणून (उलट किंवा सुलट) स्वर उत्पन्न करावे लागतात, त्यांस **मेंड** ह्मणतात. **मेंड** हा पहिला अलंकार.

२—पडद्यांवरून **घर्षणानें** (बोंटें उडवून) स्वर उत्पन्न करितात त्यांस **जमजमा** ह्मणतात. हा दुसरा अलंकार.

३—**मेंड** व **जमजमा** यांच्या मिश्रणानें तिसरा अलंकार होतो.

४—स्वरांचें **आंदोलन** करणें हा चवथा अलंकार. **आंदोलन** जलद लयींत केलें कीं **कंप** होतो. **आंदोलन** व **कंप** यांचे-योगानें गाण्याच्या निरानिराळ्या तऱ्हा होतात.

अलंकाराचे पोटभेद.

अलंकाराच्या उदाहरणांत कोणी ६६, कोणी ६३, कोणी ५६, कोणी ४५, कोणी २५ व कोणी १ अशीं उदाहरणें दिलीं आहेत, असें आह्मी सांगितलें; याचें कारण वर दिलेल्या चार अलंकारांचे पोटभेद प्रस्ताराच्या सहाय्यानें अनेक होतात त्यांतून वाटेल त्यानें वाटेल तितकीं उदाहरणें दिलीं आहेत. हीं उदाहरणें कशीं करावीं

यांची मोडणी सांगितली ह्मणजे झालें; प्रत्येक उदाहरणास नांव दिलेंच पाहिजे असें नाहीं. (नांवासंबंधानें रागांच्या नांवांसंबंधें दिलेलें विवेचन पहा).

स र ग मा प ध न सं असे स्वर मांडले (यांतच आणखी सप्तकें मांडिलीं कीं, जास्त प्रकार होतील हें सांगावयास नको).

१ व ते **अलंकारांत** गाइले हा एक अलंकार झाला.

२ आतां एक स्वर सोडून एक स्वर घेतला कीं आणखी एक प्रकारचा **अलंकार** झाला. जसें—**स ग, र मा, ग प, मा ध, प न, ध, सं** इ. इ.

३ याचप्रमाणें दोन स्वर सोडून पुढचा स्वर घेतला. जसें—**स मा, र प, ग ध,** इ.

४ याचप्रमाणें ४–५–६–७ स्वर सोडून पुढचा स्वर घ्यावा.

५ स्वराची एक वेळ आवृत्ति करणें. जसें—**स स, र र, ग ग, मा मा,** इ. इ.

६ याचप्रमाणें पुष्कळ वेळां आवृत्ति करावी. जसें—**स स स, र र र, ग ग ग, मा मा मा,** इ. इ.

आतां प्रस्ताराचा उपयोग करून प्रकार करूं. तीन स्वरांची ६ उदाहरणें करून दाखवितों ह्मणजे बाकीच्या स्वरांचा प्रस्तार उपयोगांत आणितां येईल—

१ स र ग, र ग मा, ग मा प, मा प ध इ. इ.

२ र स ग, ग र मा, मा ग प, प मा ध इ. इ.

३ स ग र, र मा ग, ग प मा, मा ध प इ. इ.

४ ग स र, मा र ग, प ग मा, ध मा प इ. इ.

५ र ग स, ग मा र, मा प ग, प ध मा इ. इ.

६ ग र स, मा ग र, प मा ग, ध प मा इ. इ.

याप्रमाणें वाटेल तितक्या स्वरांनींयुक्त अलंकार अनेक करितां येतील. यांच्यांत स्वरांत मागेंपुढें जाऊन आणखी प्रकार करितां येतात.

१ एक स्वर पुढें जाऊन पुनः पहिल्या स्वरावर येणें. जसें— **स र स, र ग र, ग मा ग, मा प मा, प ध प,** इ. इ.

२ एक स्वर पुढें जाऊन पहिल्या स्वरावर येणें, पुढें दोन स्वर पुढें जाऊन परत क्रमानें पहिल्या स्वरावर येणें, पुढें ३ स्वर पुढें जाऊन असेंच क्रमानें परत पहिले स्वरावर येणें व याच क्रमानें स्वर वाढवीत क्रमानें परत पहिले स्वरावर येणें. जसें—**स र स, स र ग र स, स र ग मा ग र स, स र ग मा प मा ग र स, स र ग मा प ध प मा ग र स, स र ग मा प ध न ध प मा ग र स, स र ग मा प ध न स़ न ध प मा ग र स** इ. इ. इ.

३ यांतच पुनरावृत्ति करणें. **स र ग र स र ग, र ग मा ग र ग मा, ग मा प मा ग मा प, मा प ध प मा प ध** इ. इ.

४ अशाच तऱ्हेनें वाढवून. **स र ग मा ग र स र ग मा, र ग मा प मा ग र ग मा प, ग मा प ध प मा ग मा प ध** इ. इ. इ.

सारांश, आपणास वाटतील तितके प्रकार सहज करितां येतील हें वरील मोडणीवरून लक्ष्यांत येईल. मुख्य मुद्दा एवढाच कीं, हे स्वर अलंकारिक (ह्मणजे आकारांत–मेंडेनें) गावयाचे. रागास जे स्वर लागत असतील तेवढ्याच स्वरांत अशा प्रकारानें अलंकाराचे प्रकार करून उपयोगांत आणावे. पुढील भागांत कवित्वांचा विचार करितांना अलंकारांविषयीं विशेष विस्तृत विवेचन करूं व त्यांचा उपयोगही करून दाखवूं.

अलंकाराची लेखनपद्धति.

१ अलंकारिक स्वर लिहितांना लहान अक्षरांचा उपयोग करावा.

जो स्वर लहान अक्षरांत लिहिला तो आकारांत गावा; व वाद्यांत नखीच्या आघाताशिवाय डाव्या हातानें मेंड खेचून किंवा बोटें उडवून उत्पन्न करावा.

उ०–**स**रग–यांत **स**वर नखीनें आघात करून रग हे स्वर (लहान अक्षरांत लिहिलेले) मेंडेनें उत्पन्न करावे.

सनधप–यांत प्रथम **प**च्या पडद्यावर **स** इतकी तार ताणून आघात करावा व उलट मेंडेनें **न ध प** हे स्वर काढावेत.

सरसरसरस–यांत **स**वर नखीचा आघात करून **र**पर्यंत मेंड खेचावी व पुनः तार **स**वर परत आणावी व पुनः **र**पर्यंत खेचावी व पुन **स**वर परत आणावी. इ.

बारीक आक्षरांखालीं ~~~ अशी रेखा घातली असल्यास ते स्वर जमजम्यानें (पडद्यांवर बोटें उडवून) काढावेत. जसें– **स**रम, **स**नधप, **स**रसरसरस. ज्या अक्षरांखालीं m अशी खूण असेल तें अक्षर हालल्यासारखें करावें. जसें– **स, र, ग** इ. इ. इ.
m m m

तात्पर्य, मोठ्या अक्षरांवर नखीचा **आघात** करावयाचा व बारीक अक्षरें डाव्या हातानें **मेंडेंत** अथवा **जमजम्यांत** जशीं लिहिलीं असतील तशीं वाजवावीं.

गातांना–मोठ्या अक्षरावर--**सरगम–गत–चीज**–यांच्या अक्षराचें उच्चारण ठेवावें व बारीक अक्षरें आकारांत गावीं.

कठीण गतीविषयीं.

सोप्या गतीमध्यें रागांस योग्य त्या **अलंकारांचा** उपयोग केला ह्मणजे **कठीण गती** होतात.

अलंकार घालावयास नियम.

१ **अलंकाराचा** उपयोग करितांना मूळ **बोलाचें** स्वरूप बदलतां उपयोगीं नाहीं. जसें–**दिड** या बोलावर कोणताही **अलंकार** घालावयाचा नाहीं; कारण, त्यावर अलंकार घातल्यास **दिडचें** स्वरूप बदलेल.

२ **अलंकाराचा** मुख्य उपयोग स्वरांमध्यें पडलेला **खंड** भरून काढावयाकरितां आहे. जसें–**हिंडोलांत मच्या** पुढें **ध**, **न** येतां, **न** आला असेल अशा वेळीं **म** व **न**, यांमधील **ध** स्वर **न** घेतल्यानें जो खंड पडतो तो भरून काढण्याकरितां **मवर धपर्यंत मेंड** खेचून (मध) **न**शीं संबंध जोडिल्यानें मधील खंड भरून येईल इतकेंच नाहीं, तर विशेष गोडही लागेल. रागामध्यें **आलाप** घेण्यास **जोड** घेणें असें जें नांव पडलें आहे तें या प्रकारानें स्वरांचा संबंध जोडण्यावरूनच पडलें असावें.

३ यावरून असें लक्ष्यांत येईल कीं, अलंकाराची योजना करणें (आरोहण व अवरोहणांत) क्रमानें पुढील स्वरांवर व मागील स्वरांवर अवलंबून आहे.

४ याच्याच पुढें गाण्याच्या चार तऱ्हा सांगितल्या आहेत, त्यांपैकीं आपण ज्या **रागांत** गत तयार केली असेल, त्या रागाला कोणती तऱ्हा लागूं पडते तें ठरवून त्या तऱ्हेचे (**मेंड** अगर **जमजमा**) अलंकाराची योजना करावी.

५ प्रथम एका स्वराच्या **मेंडे**इतकाच **अलंकार** उपयोगांत आणावा; मग दोन–तीन–चार–पांच स्वरांची मेंड खेंचण्याचा अभ्यास करावा.

६ **अलंकारिक** अक्षरांना **तालाच्या** हिशेबांत किंमत नाहीं; ह्मणजे ज्या स्वरावर **अलंकार** घातला असेल त्या स्वराची **ताला-**

मध्यें जी किंमत असेल ती, **अलंकार** घातल्यावर सुद्धां कायम राहिली पाहिजे. जसें–ग या स्वराची एका अक्षराइतकी किंमत आहे–**गवर–ग** म, **ग** म ध, **ग** म ध न, **ग** म ग म ग म, **ग** म ध न ध म इ. कोणताही **अलंकार** घातला तरी ती **मेंड** एका अक्षराच्या अवकाशांत वाजविली पाहिजे. हें प्रथम जड जाईल, म्हणून क्रमाक्रमानें स्वर वाढवून **मेंडेचा** अभ्यास करावा.

७ **गतींत–चिजेंत** किंवा **सरगममध्यें अलंकार** घालितांना प्रत्येक स्वरावर **अलंकार** घातलाच पाहिजे असें नाहीं. कानाला गोड लागून, **गतीचें** सौन्दर्य वाढेल व **रागाला** शोभा येईल, या बेतानें **अलंकाराचा** उपयोग करावा.

उदाहरणार्थ–**भूप** रागांतील एका सोप्या **गतींत अलंकार** घालून दाखवितों.

सस । र रर र ग ॥ प ध ध

सस । ध धध प ग । र र र

ही **भूप** रागांतील एक सोपी **गत** आहे. या **गतींत** प्रत्येक अक्षराचा विचार करून **अलंकार** योजूं.

१ **दिड (सस)** यावर **अलंकार** घालावयाचा नाहीं.

२ **दा (र)** यावर **अलंकार** घालावयाचा. प्रथम असा विचार केला कीं, यावर कोणकोणते अलंकार शक्य आहेत. यापुढें **रर** म्हणजे **र** आहे, तेव्हां असें स्पष्ट दिसतें कीं, पुनः **र**च्याजवळ येईल असाच **अलंकार** घातला पाहिजे. **भूप** रागांत केवळ **मेंड** (धृवपदाच्या पद्धतीनें) या **अलंकाराचा** उपयोग करावयाचा म्हणून आपण घालावयाचे **अलंकार** त्याच धर्तीवर असले पाहिजेत. तेव्हां **रवर** तार ताणून **ग**पर्यंत (रग) **मेंड** घेतली तरी एक अलं-

कार होईल. (रगर) अशी मेंड घेऊन पुनः रवर आलें तरी चालेल किंवा एक एक स्वर वाढवून–

रगपग, रगपगर, रगपधपग, रगपधपगर, अशा मेंडाही बसतील, किंवा रगरगरगर अशी किंवा अशाच प्रकारची आवृत्ति करून पुनः रवर येतां येईल. यांपैकीं आपल्या अभ्यासाच्या मानानें आपणास झेपेल तो प्रकार योजावा. नवीन अभ्यास करणाराकरितां म्हणून आपण एकच स्वराची मेंड रगर उपयोगांत आणूं. पुढील सर्व स्वरांसंबंधीं हाच हिशेब लक्ष्यांत ठेवावा.

३ दिड (रर) यावर अलंकार नाहीं.

४ दा (र) यापुढें गवर जावयाचें आहे, ह्मणून रवर आघात देऊन गपर्यंत मेंड घ्यावी. हा अलंकार योग्य आहे–रग.

५ डा (ग) यापुढें पवर जावयाचें आहे, तरी गवर आघात देऊन पपर्यंत मेंड खेंचावी, हा अलंकार योग्य आहे–गप.

६ दा (प) यापुढें धवर जावयाचें आहे, तरी पवर आघात देऊन धपर्यंत मेंड खेंचावी–पध.

७ दा (ध) यापुढें पुनः धवरच यावयाचें आहे, तरी धवर आघात देऊन सपर्यंत मेंड खेंचून तशीच परत धवर आणावी–धसध पुढील धच्या पुढें सवर जावयाचें आहे, तरी त्यावर अलंकार ठेविलाच पाहिजे; करितां या धवर अलंकार न ठेविला तरी चालेल.

८ डा (ध) यापुढें सवर जावयाचें आहे, तरी धवर आघात देऊन सपर्यंत मेंड घ्यावी. धस.

९ दिड (सस) यावर अलंकार नाहीं.

१० दा (ध) याच्या पूर्वी स आला आहे, म्हणजे सपासून धवर यावयाचें आहे, ह्मणून धच्या पडद्यावर सपर्यंत तार

ताणून आघात द्यावा व उलट मींडेनें धवर यावें, हा अलंकार योग्य आहे. सं़ध.

११ दिड (धध) यावर अलंकार नाहीं.

१२ दा (प) धपासून पवर यावयाचें आहे, म्हणून प्रथम पवर धपर्यंत तार खेंचून आघात द्यावा व उलट मींडेनें पवर यावें. धप.

१३ डा (ग) पपासून गवर यावयाचें आहे, ह्मणून प्रथम गवर पपर्यंत तार खेंचून आघात करावा व उलट मींडेनें गवर यावें. पग.

१४ दा (र) गपासून रवर यावयाचें आहे, ह्मणून प्रथम रवर गपर्यंत तार खेंचून आघात द्यावा व उलट मींडेनें रवर यावें. गर.

१५ दा (र) मागील बोल र आहे व पुढील रच आहे, तेव्हां (२ रे बोलाप्रमाणें) रगर हा अलंकार घातला.

१६ डा (र) यावर गत संपली आहे, तरी यावर अलंकार नको.

आतां सर्व गत आमच्या लेखनपद्धतीनें लिहितों :—

सस । रगर रर रग गप ॥ पध धसंध धसं संसं ° संध धध धप पग । गर रगर र

येणेंप्रमाणें गतींमध्यें अलंकार घालून कठीण गती कराव्या. आपण केलेली गत चांगली झाली आहे किंवा नाहीं याबद्दल मत ठरविण्यापूर्वी गत पहिल्यानें स्वच्छ मोठ्या अक्षरांत तालामध्यें लिहावी, व वाजवून वाजवून पाठ करावी. न बघतां वाजवितां आली म्हणजे मग ती चांगली आहे किंवा कसें हें आपोआप कळेल. शेंपन्नास गती तयार केल्या ह्मणजे स्वर-राग इ. ओळखण्याचा

अभ्यास होईल. व ज्या ठिकाणीं गत चांगली लागणार नाहीं, त्या ठिकाणीं सुधारणा करावयास कठिण पडणार नाहीं. या पुस्तकावरून अभ्यास करणारांस कांहीं अंशीं स्वतः 'स्वतःचा शिक्षक' बनावयाचें आहे, म्हणून मेहनत घेतली पाहिजे. गत पाठ होण्यापूर्वी तीवर मत देण्याचा विचार केल्यास गत गोड तर लागणार नाहीं, पण व्यर्थ शीण मात्र होईल.

कवित्त्वांविषयीं.

राग कसे करावे—त्यांचा विस्तार कसा करावा—त्यांच्यांत अनुरूप अलंकाराचा उपयोग करून त्यांचें सौन्दर्य कसें वाढवावें या गोष्टींचें ज्ञान झालें म्हणजे कोणतेंही कवित्त्व गाण्यास किंवा वाजविण्यास काठिण पडणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर जुनी कवित्त्वें जुने लोक जशीं गात होते तशींच आपणासही गावयास आलीं पाहिजेत. जयदेव कवीनें केलेल्या अष्ट पद्यांवर रागाचें व तालाचें नांव दिलें आहे. तेव्हां जयदेव कवी त्या अष्टपद्या कशा गात होते हें समजण्यास मुळींच हरकत नाहीं. कारण, ज्याप्रमाणें आम्हीं दिलेल्या नियमानुसार केलेल्या रागांत जुन्या सर्व रागांचा समावेश झालाच पाहिजे, त्याप्रमाणें आम्ही सांगूं त्या पद्धतीनें कवित्त्व बसविण्याची खटपट केली कीं, जुनीं सर्व कवित्त्वें जुन्या पद्धतीचे लोक जशीं गात होते तशीं गातां आलीं पाहिजेत; एवढेंच नव्हे, तर सध्यां प्रचारांत आढळणाऱ्या जुन्या कवित्त्वांतील चुका ठळकपणें आपल्या नजरेस येतील व त्यांची दुरुस्ती करून गातां येईल.

कवित्त्वें अनेक प्रकारचीं आहेत. धृवपद, ख्याल, ठुंबरी, टप्पा, धमार, होरी, अष्टपदी, तराणा, त्रिवट, चतरंग, सरगम, पद, पाळणा, दादरा, रेख्ता, रवई, झिक्री, गझल, लावणी व अभंग—साकी—दिंडी—वगैरे सर्व वृत्तांचीं कवित्त्वें गाण्याच्या उपयोगीं आहेत.

निरनिराळीं कवित्त्वें गावयाचे मार्ग निरनिराळे आहेत. परंतु, मुख्यतः पाहतां हे मार्ग चार आहेत. हे भेद निरनिराळ्या पद्धतींपासून झाले आहेत. तेव्हां या चारी पद्धतींचें पूर्ण ज्ञान झालें असतां कोणतेंही कवित्त्व गावयास येईल, हें सांगावयास नको. जुने लोक जुनें कवित्त्व जसें गात होते, तसेंच गातां येईल असें ह्मणण्याचें कारण तरी हेंच कीं, या चार पद्धतींपैकीं एकींत त्याचा समावेश झालाच पाहिजे. आतां हे चार भेद कोणते ते पाहूं.

गाण्याचे मुख्य भेद चार.

गाण्याचे भेद अलंकाराच्या योगानें होतात. जसें—

१—नुसत्या मेंड कामाचाच ज्यांत उपयोग केलेला असतो तें गाणें.

२—केवळ जमजम्याचा उपयोग ज्यांत केलेला असतो तें गाणें.

३—पुष्कळशी मेंड व थोडासा जमजमा यांच्या मिश्रणानें युक्त जें गाणें तें.

४—पुष्कळसा जमजमा व थोडीशी मेंड यांच्या मिश्रणानें युक्त जें गाणें तें.

येणेंप्रमाणें गाण्याचे मुख्य चार भेद होतात. यांशिवाय पोटभेद बरेच आहेत. हे भेद अलंकाराच्या सहाय्यानें होतात. पुढील भागामध्यें यासंबंधीं सविस्तर विवेचन होईलच.

मागें सांगितलेंच आहे कीं, गाणें दोन प्रकारचें आहे. (१) साधें गाणें. (२) अलंकारयुक्त गाणें. जरी कवित्त्व गाण्याविषयीं विचार पुढील भागांत करावयाचा आहे, तरी या भागाचा अभ्यास करणाऱ्यांकरितां साधें गाणें कसें बसवावें तें सांगतों.

साधें गाणें.

साधें गाणें ह्मणजे ज्या **गाण्यांत** नुसत्या **स्वरांचा** उपयोग करावयाचा असतो तें गाणें. प्रथम एखादें **कवित्त्व** घ्यावें व त्याचीं **अक्षरें** मोजावीं. हीं अक्षरें मोजितांना **र्‍हस्व-दीर्घांचा** विचार केला पाहिजे. **र्‍हस्व** अक्षरापुढें **विराम** करितां कामा नये. **दीर्घ अक्षरापुढें विराम** योजावा. **पदच्छेद** बरोबर केलेला असावा. कवित्त्वाच्या **रसा**कडेही दृष्टी द्यावी, व त्यांस अनुलक्षूनच कवित्त्व बसविण्याचा **राग** ठरवावा. अक्षराच्या संख्येच्या अनुरोधानें ताल ठरवावा.

कवित्त्व कोणत्या **रागांत** बसवावयाचें हें ठरविल्यावर त्या **रागा**मध्यें कवित्त्वाच्या अक्षरांच्या संख्येइतक्या अक्षरांनींयुक्त अशी एक **सरगम** करावी, व त्या **सरगम** खालीं कावित्त्वाचीं **अक्षरें** क्रमानें लिहावीं, व त्या त्या स्वरांत गावीं ह्मणजे झालें.

प्रत्येक **कवित्त्वाचे** मुख्यतः **दोन** व कांहींचे **चार** भेद केलेले आहेत.

(१) **अस्थाई**, (२) **अंतरा**, (३) **अभोग** व (४) **सुभोग**.

यांपैकीं प्रथम दोहोंचा विचार नवीन शिकणारांनीं करावा.

अस्थाई व **अंतरा** ह्मणजे कवित्त्वाचीं जीं निरनिराळीं **कडवीं** असतात त्यांच्यांतच पाडिलेले भेद होत.

कावित्त्वाचें प्रथम **कडवें** (चरण) गाणें ह्मणजे **अस्थाई** गाणें होय.

पुढील **कडवें** (चरण) गाणें म्हणजे **अंत्रा** गाणें होय.

अस्थाई व **अंत्रा** यांमध्यें फरक एवढाच कीं, **अस्थाई**मध्यें **टिपेचा** (तार सप्तकांतील) स्वर मुळींच येतां कामा नये. पण **अंत्या**मध्यें **टिपेचा** स्वर होतां होईतों झटकन् आलाच पाहिजे.

यासंबंधीं यथार्थ व विस्तृत माहिती पुढील भागांत देऊं. आतां एक कवित्त्व घेऊन तें कसें बसवावें तें सांगतों.

पद कबिराचें.

नजर न आवे आतम ज्योती ॥ ध्रु० ॥
तेल न बत्ती पूजन जाती ॥
नहि जागत न हि सोती ॥ १ ॥
झिलमिल झिलमिल निसदिन चमके
जैसा निर्मळ मोती ॥ २ ॥
कहत **कबीरा** सुन भाइ साधू
घरवर बाचत पोथी ॥ ३ ॥

यांपैकीं पहिला **चरण** अस्थाईंत गावयाचा.

प्रथम यांतील अक्षरांची संख्या मोजूं. **दीर्घ** अक्षरापुढें **विराम** (लांबविणें) ठेवावयाचा.

नजर न आ०वे० आ०तम जो०ती० ॥ ध्रु० ॥
ते०ल न बत्ती० पू०जन जा०ती०० ॥
नहि जा०गत नहि सो०ती० ॥ १॥
झिलमिल झिलमिल निसदिन चमके० ॥
जै०सा० निरमळ मो०ती० ॥ २ ॥
कहत कबी०रा० सुनभाइ सा०धू० ॥
घरघर बा०चत पो०थी० ॥ ३ ॥

या पदांतील पहिला चरण ' नजर न इ० ' हीच अस्थायी होय. यांत सोळा अक्षरें आहेत; तरी यास आपण **आदिताल** लावूं. (दुसऱ्या तालांत गावयाचें असल्यास विरामांची संख्या वाढवून तालाला लागणाऱ्या अक्षरांची भरती करावी.) हें पद आपण

सारंग रागांत लिहूं. **सारंग** रागाचे स्वर **स, र, मा, प, ना** हे आहेत. यांत **वादी र** व **संवादी प** आहेत. सुरुवात रपासून करावयाची व रवरच राग संपवावयाचा. (**सारंग** राग कां योजिला व रागाची योजना कशी करावी हें या भागांत सांगितलें नाहीं.) असो. आतां रपासून सुरुवात करून **प**पावेतों पुढें जाऊं, अशा तऱ्हेनें एक ‘ सरगम ’ करूं.

। न ज र न ॰। आ० वे० । आ० तम ॥ जो० ती०
। र र र मा ॰। प-० र-० । स-० नास ॥ र-० र-०

अशी अस्थायी झाली. कवित्वाचीं अक्षरें लक्ष्यांत घेऊन या ‘ सरगम ’ करावयाच्या आहेत, तरी **प**पासून उलटतांना **मा** गाळिला आहे. कारण वे या अक्षरावर पदच्छेद पडतो आहे व विरामही आहे. आतां आपल्या क्रमाप्रमाणें **मा** स्वर वेच्या खालीं आला व त्यावर एक अक्षराइतका विराम पडला, याच्या आधीं **प** येऊन पुढें **मा**–० आला तर **प** या **संवादी**चें महत्व राहणार नाहीं म्हणून **मा** स्वर गाळणें भाग पडलें. अलंकाराचा उपयोग करितांना अशा प्रकारची अडचण पडणार नाहीं; कारण त्या ठिकाणीं हवा तो स्वर उपयोगांत आणण्यास मार्ग आहे.

अंतरा.

॰। ते० ल न । ब० त्ती० ॥ पू० ज न । जा० ती०
। र-० र मा । प-० ना-० ॥ स़-० ऱ़ ऱ़ । ऱ़-० स़-०

॰। न हि जा० । ग त न हिं ॥ सो०ती०
। ना प प-० । मा र स ना ॥ स-० र-०

॰। झिलमिल । झिलमिल ॥ निसदिन । चमके,
। र र र मा । प प ना स़ ॥ ऱ़ ऱ़ ऱ़ ऱ़ । स़नाप-०

। जै॰ सा॰ । निरमल ॥ मो॰ ती॰
। र-॰ स-॰ । नापपमा ॥ र-॰ र-॰

। कहतक । बी॰ रा॰ ॥ सुनभाइ । सा॰ धू॰
। ररमा । प-॰ ना-॰ ॥ ससरर । र-॰ स-॰

। घरघर । बा॰ चत ॥ पो॰ थी॰
। नापपमा । र-॰ नांस ॥ र-॰ र-॰

ती या अक्षरावर **ना** हा स्वर येऊन त्या ठिकाणीं ० एक अक्षराइतका विराम येतो आहे व त्यामुळें अस्थाईमध्यें जी **मा** घेतल्यानें चुकी होईल ह्मणून सांगितलें, तीच चुकी होते आहे; पण ज्या प्रमाणें त्या ठिकाणीं मा अजिबात गाळला त्याप्रमाणें या ठिकाणीं **ना** गाळतां येत नाहीं, ह्मणून तो तसाच ठेविला आहे. अलंकार घालितांना त्यावरील विरामाच्या जागीं पुढील स्वर घालून **ना**ची किंमत कमी करितां येईल हें पुढील भागांत दाखवूं. यावरून एवढें मात्र लक्ष्यांत येईल कीं, अलंकाराचा उपयोग अशा पकारचे अयब झाकण्याकडे फार होतो. कवित्त्वासंबंधें संपूर्ण माहिती देतांना हेंच पद पुनः घेऊन आपल्या पद्धतीप्रमाणें निरनिराळ्या सरगममध्यें बसवून अलंकाराच्या सहाय्यानें वरील प्रकारचे दोष नाहींसे करून दाखविण्याचा विचार आहे. तात्पर्य, सरगम पद्धतीनें सरगम कराव्या व त्या कवित्त्वाच्या अक्षरांखालीं लिहाव्या. लिहितांना माल वर दाखविलेले धोरणानें लिहाव्या. अशा वेळीं अलंकाराचा उपयोग न केल्यानें जो खंड पडेल तो अपरिहार्य आहे असें समजावें. प्रत्येक कडव्याचे शेवटीं पुनः अस्थाई ह्मणावी—याच धोरणानें त्यांचा आरंभ काळांत लिहिला आहे.

हा भाग संपवितांना कवित्त्व कसें बसवावें, याचें उगाच किंचित् दिग्दर्शन केलें आहे. त्याबद्दल सकारण माहिती दिली नाहीं.

कवित्त्यें कशीं बसवावीं व त्यांमध्यें कोणताही दोष न ठेवितां तीं कशीं बसवावीं, हें लिहिण्यास एक स्वतंत्र भागच केला पाहिजे, इतका तो विषय विस्तृत व व्यापक आहे; म्हणून पुढील भागास या विषयापासूनच आरंभ करूं व धृवपदें, ख्याल, इ. कवित्त्वें कशीं बसवावीं तें व्यवस्थित पद्धतीनें दाखवूं. याशिवाय पुढील भागांत—मिश्र, संकीर्ण—छायालग—वेसर या रागांची मुख्य व पोटभेदासुद्धां माहिती—त्या रागांत गती—सरगम—चतरंग—तराणे वगैरे कसे करावे—आलाप (जोड), झाला—ठोक, व रागांचें मेलन याविषयीं माहिती देऊन जुन्या कवित्त्वांची मीमांसा करून त्यांतील गुणदोषांचें विवेचन करूं.

(पहिला भाग समाप्त).

परिशिष्ट (१).

—:⁂:—

श्रुति, स्वर व ग्राम.

॥ गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते ॥

संगीत शब्दानें **गाणें**, **वाजविणें** व नाचणें या तिहींचा बोध होतो; परंतु, आह्मां आपल्या पुस्तकांत फक्त **गाणें** व **वाजविणें** एवढ्यापुरता **संगीत** हा शब्द वापरला आहे.

गाण्यावाजविण्याचें काम स्वरांच्या सहाय्यानें होतें. **स्वर** ह्मणजे चित्तास निसर्गत:–आनंद देणारा असा ध्वनि. संगीत शास्त्रांत अशा बावीस **ध्वनींचा** विचार केला आहे. त्या प्रत्येक ध्वनीस **श्रुति** अशी संज्ञा दिली आहे.

श्रुति हा शब्द संस्कृत श्रु=ऐकणें या धातुपासून झाला आहे. तेव्हां श्रुति या शब्दाचा अर्थ ऐकूं येणारा ध्वनि असा दिला आहे. असे **ध्वनी** बावीस आहेत, असें शास्त्रकारांनीं निश्चित केलें आहे. वर सांगितलेंच आहे कीं, **स्वर** ह्मणजे निसर्गतः चित्तास आनंद देणारा ध्वनि. ऐकूं येणाऱ्या या बावीस ध्वनींत प्रथमारंभीं असें आढळून आलें कीं, **स्वर** या संज्ञेस पात्र असे फक्त सातच **ध्वनी** आहेत. यांवरून असें ठरविलें कीं, **स्वर** सात आहेत. त्यांचीं नांवें:—

षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत व **निषाद** या स्वरांना **शुद्धस्वरसप्तक** असें ह्मटलें.

पुढें अधिक विचारांतीं असें समजलें कीं, बावीस श्रुतींत या सात स्वरांशीं मिळत्या अशा आणखी पांच श्रुती आहेत व त्यांचा उपयोग केल्यानें गोडीचा बिघाड होत नाहीं. तेव्हां याही पांच श्रुती मिळवून एकंदर स्वर बारा आहेत असें ठरविलें. या नवीन पांच स्वरांस नांवें देण्याचा विचार केला तेव्हां असें आढळलें कीं, हे नवीन पांच स्वर वेगळे नसून मूळ सात स्वरांतील कोणत्या-ना कोणत्या तरी स्वरांचे अंश आहेत; ह्मणून नवीन नांवें न देतां मूळ स्वरांच्या नांवांमागें **कोमल, तीव्र** अशीं विशेषणें देऊन काम भागविलें. या पांचांपैकीं पहिला स्वर हा **ऋषभाचा** अंश दिसून आला. पण तो **ऋषभा**पेक्षां मृदु असल्यामुळें त्यांस **कोमल-ऋषभ** असें नांव दिलें. दुसरा स्वर **गांधाराचा** अंश असून त्यांपेक्षां मृदु असल्यामुळें त्यास **कोमल गांधार** असें नांव दिलें. तिसरा स्वर **मध्यमाचा** अंश असून त्यापेक्षां चढा असल्यामुळें त्यास **तीव्र मध्यम** असें नाव दिलें. चवथा स्वर **धैवताचा** अंश असून त्यांपेक्षां मृदु असलेमुळें त्यांस **कोमल धैवत** असें नांव दिलें. पांचवा स्वर **निषादाचा** अंश असून त्यांपेक्षां मृदु असल्यामुळें त्यांस **कोमल निषाद** असें नांव दिलें.

यांवरून असें दिसून येईल कीं, मूळ सात शुद्ध स्वरांपैकीं फक्त **षड्ज** व **पंचम** हे दोन स्वर अविकृत राहिले, व बाकीच्या पांच स्वरांपैकीं चार स्वरांचे कोमल व एकाचा तीव्र असे भेद उत्पन्न झाले. **कोमल** व **तीव्र** या संज्ञा सापेक्ष असल्या-मुळें सारखेपणा रहावा ह्मणून अशी व्यवस्था केली कीं, ज्या शुद्ध स्वरापासून **कोमल** हा भेद मिळाला त्या शुद्ध स्वरास **तीव्र** हें विशेषण लावावें व ज्या शुद्ध स्वरापासून **तीव्र** हा भेद मिळाला, त्या शुद्ध स्वरास **कोमल** हें विशेषण लावावें. **शुद्ध** स्वर दोन, **कोमल** स्वर पांच, व **तीव्र** स्वर पांच, मिळून एकंदर स्वरांची संख्या बारा झाली. त्यांचीं नांवें :—षड्ज, **कोमल ऋषभ, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र धैवत, कोमल निषाद** व **तीव्र निषाद**; या स्वरांमध्यें विकृत स्वरांचा समावेश केला असल्यामुळें या बारा स्वरांस **विकृतस्वरसप्तक** असें नांव दिलें. शास्त्रांत—॥ **शुद्ध स्वराः सप्त विकृता द्वादशा अपि** ॥ असें स्पष्ट ह्मटलें आहे. साधारणतः मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्ति **शुद्धस्वरसप्तक** काढण्याकडेच असते.

उत्तम गवय्यांस तरी तीव्र स्वर जितके बरोबर काढितां येतात तितके कोमल स्वर काढितां येत नाहींत. कोमल स्वरांत कमीअधिक झालेला फरक त्यांना ओळखितां येत नाहीं. परंतु तीव्र स्वर जरा अलीकडे पलीकडे (केशाग्राइतका) झाला कीं त्यांना वाईट लागतो.

यानंतर उरलेल्या दहा **श्रुतींचा** उपयोग करावयाचा निश्चय करून त्या-संबंधीं खटपट केल्यानें असें आढळून आलें कीं, प्रथम ठरविलेल्या बारा स्वरांच्या समूहांतून सात स्वर मूळ कल्पून या दहा श्रुतींपैकीं पांच **श्रुती, कोमल-तीव्र** भेदानें त्यांत मिळविल्यानें कानांस गोड लागेल असा दुसरा एक स्वरसमूह (बारा स्वरांचा) मिळतो. हा **स्वरसमूह** जरी गोड लागतो तरी पहिल्या स्वरसमूहा-इतका गोड लागत नाहीं ; पण त्याच्याशीं मिळता माल येतो.

आतां फक्त पांच **श्रुती** उपयोगांत आणावयाच्या राहिल्या. त्यांचाही उपयोग वरील रीतीनें करून आणखी एक **स्वरसमूह** (बारा स्वरांचा) मिळाला. हा **स्वरसमूह** पहिल्या स्वरसमूहाशीं दुसऱ्या स्वरसमूहाइतका मिळतां न आल्यानें अभ्यास करण्यास कठिण, किंबहुना अशक्य, झाला.

तिन्ही स्वरसमूहास नांवें द्यावयाचीं तीं त्यांच्या लक्षणांचें सूक्ष्म अवलोकन करून दिलीं. पहिल्यानें असें ठरविलें कीं, **स्वरसमूहास ग्राम** अशी संज्ञा द्यावी. आपल्यापाशीं **स्वरसमूह** तीन आहेत, तरी त्यांचीं लक्षणें वेगवेगळालीं दिसतील अशीं तीन विशेषणें **ग्राम** शब्दाला लावावयाचीं. तेव्हां प्रथम स्वरसमू-हाच्या लक्षणांवरून त्यांस **षड्जग्राम** असें नांव दिलें. दुसऱ्या स्वरसमूहास त्याच्या लक्षणांवरून **मध्यमग्राम** असें नांव दिलें. तिसऱ्या स्वरसमूहास त्याच्या लक्षणांवरून **गांधारग्राम** असें नांव दिलें.

प्रस्तुत पुस्तकांत फक्त **षड्जग्रामाचा** विचार केला आहे. कारण,
प्रचारांत सर्वत्र **षड्जग्रामच** उपयोगांत आणितात.
शास्त्रांत सुद्धां ॥ षड्जग्राम स्त्रिवृतम:॥ **षड्जग्राम** हा तिन्ही **ग्रामांत** उत्तम
आहे असें स्पष्ट लिहिलें आहे. **नारदानीं** शिक्षेंत अभिप्राय दिला आहे कीं–
॥ भूर्लोकाज्जायते षड्जः भुवर्लोकाच्च मध्यमः ॥ स्वर्गान्नान्यत्र गांधारो नारदस्य
मतं यथा ॥ १ ॥.

याचें कारण, **मध्यमग्राम** जसा **षड्जग्रामाशीं** मिळता येऊन गोडीची
हानी करीत नाहीं, तशी स्थिति **गांधारग्रामाची** नाहीं हें उघडच आहे. ह्मणजे
बावीसपैकीं पांच श्रुतींचा उपयोग मुळींच करावयाचा नाहीं. आपल्या लोकांत फक्त
सतरा श्रुतींचाच उपयोग करावयाचा. असें असून **बावीस** श्रुतींचा उपयोग आह्मी
करून दाखवितों, असें ह्मणणारांचा प्रयत्न किती चुकीचा आहे हें निराळें सांगाव-
यास नको.

षड्जग्रामाचा विचार पूर्णपणें केल्यावर आह्मी **मध्यमग्रामाचा** विचार
करून **मध्यमग्रामांतील** रागांचा उदाहरणांसहीत विचार करूं.

या पुस्तकांत **षजड्ग्रामाचा** विचार करावयाचा आहे, ह्मणून **षड्ज-**
ग्रामाचें लक्षण सांगतों.

ज्या बारा स्वरांतील कोणत्याही स्वरांस **षड्ज** कल्पिला असतां, त्यापासून
त्याला मिळते असे **रा, र, गा, ग, मा, म, प, धा, ध, ना, न** बारा स्वर
त्याच बारा स्वरांत मिळतात, त्या बारा स्वरांच्या समूहास **षड्जग्राम** असें ह्मण-
तात. षड्ज ह्मणजे बाकींच्या स्वरांचा जनक. या लक्षणानें विशिष्ट असा प्रत्येक
स्वर ज्या **ग्रामांत** आहे, त्यालाच **षड्जग्राम** असें ह्मणतात.

स्पष्टीकरण.

आपल्यापाशीं **स, रा, र, गा, ग, मा, म, प, धा, ध, ना, न** हे
बारा स्वर आहेत, तरी हे बारा स्वर मांडून आह्मी काय ह्मणतों तें दाखवितों.

हे बारा स्वर आहेत. कारण यांत तेरापासून चोवीसपर्यंतचे स्वर, एकापासून बारा स्वराचे अनुक्रमें दुप्पटीचे स्वर आहेत.

१ स १३ स̣
२ रा १४ रा̣
३ र १५ र̣
४ गा १६ गा̣
५ ग १७ ग̣
६ मा १८ मा̣
७ म १९ म̣
८ प २० प̣
९ धा २१ धा̣
१० ध २२ ध̣
११ ना २३ ना̣
१२ न २४ न̣

आतां या बारा स्वरांपैकीं कोणत्याही स्वरास **षड्ज** कल्पिला असतां त्या **षड्जास** लागणारे पुढील सर्व स्वर याच बारा स्वरांत मिळतात. समजा, आपण **रा** (कोमल-ऋषभ) हाच षड्ज कल्पिला तर—

स—
रा-स
र-रा
गा-र
ग-गा
मा-ग
म-मा
प-म
धा-प
ध-धा
ना-ध
न-ना
स़-न
ऱा-स़

असा स्वरसमूह उत्पन्न होतो, यांत प्रथम बारा स्वरांतील **रा षड्ज** कल्पिला असल्यामुळें अनुक्रमें-**रा**=षड्ज. **र**=कोमलऋषभ. **गा**=तीव्रऋषभ. **ग**=कोमल गांधार. **मा**=तीव्रगांधार. **म**=कोमलमध्यम. **प**=तीव्रमध्यम. **धा**=पंचम. **ध**=कोमलधैवत. **ना**=तीव्रधैवत. **न**=कोमल निषाद. **स़**=तीव्रनिषाद. व पुन: **ऱा**=षड्ज (दुप्पटीचा).

आतां आपण **र** (तीव्रऋषभ) हाच **षड्ज** कल्पिला तर—

स
रा
र-स
गा-रा
ग-र
मा-गा
म-ग
प-मा
धा-म
ध-प
ना-धा
न-ध
स़-ना
ऱा-न
ऱ-स़

असा स्वरसमूह उत्पन्न होतो. ज्या स्वरास **षड्ज** कल्पिला असेल, त्याच्या दुप्पटीच्या स्वरापर्यंत प्रथम स्वरसमूह मांडावा. कारण हें लक्षण **मूर्छनेचें** आहे व ॥ ग्राम: स्वरसमूह: स्यात् मूर्छनादे: समाश्रय: ॥ असें शास्त्रांत सांगितलें आहे. प्रस्तुत स्वरसमूहांस **र** हा **षड्ज** कल्पिला आहे. तेव्हां अनुक्रमें **र**=षड्ज. **गा**=कोमलऋषभ. **ग**=तीव्रऋषभ. **मा**=कोमलगांधार. **म**=तीव्रगांधार. **प**=कोमलमध्यम. **धा**=तीव्रमध्यम. **ध**=पंचम. **ना**=कोमलधैवत. **न**=तीव्रधैवत. **स**=कोमल निषाद. **ऱा**=तीव्रनिषाद आणि **ऱ**=षड्ज. (दुप्पटीचा).

येणेंप्रमाणें एकंदर बारा स्वरसमूह ज्याचे त्यास सहज मांडितां येतील. हे बारा स्वरसमूह करावयास यांहून निराळ्या एकाही श्रुतीची जरूर लागत नाहीं; यासच

षड्जग्राम ह्मणतात. **मध्यमग्रामाचा** विचार करितांना त्याचेंही लक्षण असेंच स्पष्टपणें देऊं.

आतां फक्त या बारा स्वरांचें परस्परांतील **प्रमाण** (माप) द्यावयाचें व **सतार, बीन** वगैरे वाद्यावर या स्वराचे पडदे किती अंतरावर बांधावयाचे तें सांगावयाचें; परंतु या गोष्टीस प्रथम वाद्यासंबंधीं माहिती देणें जरूर आहे. पुढें जेव्हां वाद्याचा नकाशा देऊन, **वाद्याची लांबी, आडि, घोडी, पडदे, पडदे व तारा** यांच्यांतील **अंतर, तारांचें** परस्परांतील **प्रमाण, आडीचें** त्याचे व पडद्यावर पडणारा **बोटांचा दाब.** इ. इ. गोष्टींचा पूर्ण विचार करूं तेव्हां हें **माप**ही देऊं.

परिशिष्ट. (२)

स्वरप्रस्तार.

गाण्यावाजविण्याचा मुख्य पाया **स्वरप्रस्तार** हा होय. स्वरप्रस्तारावर हें सर्व शास्त्र अवलंबून आहे, असें ह्मटलें तरी चालेल. प्रस्तुत भागांत स्वरप्रस्तार कसा करावा व त्याचा थोडासा उपयोग हें सांगितलें आहे; परंतु पुढील भागीं स्वर-प्रस्ताराचा पूर्ण उपयोग करून दाखवावयाचा आहे, ह्मणून न कंटाळतां हें प्रकरण माहीत करून घ्यावें.

स्वरांत मागें पुढें जाणें याला **स्वरप्रस्तार** ह्मटलें असतां चालेल.

आपण घेतलेल्या स्वरांच्या संख्येला त्या संख्येंत एक-एक-कमी करून एक ही संख्या होईतोंपर्यंत होणाऱ्या संख्यांनीं गुणावें; जो गुणाकार येईल, तितके विस्ताराचे प्रकार आहेत असें समजावें.

	कितो प्रकार होतात
उ—०	१
१=	२
२×१=	६
३×२×१=	२४
४×३×२×१=	१२०
५×४×३×२×१=	७२०
६×५×४×३×२×१=	५०४०
७×६×५×४×३×२×१=	

हे प्रकार कोणते कोणते होतात ते समजण्यास नियम.

जितक्या स्वरांचा **प्रस्तार** करावयाचा असेल तितके स्वर यथाक्रम एका-पुढें एक असे मांडावे; ह्मणजे प्रथम प्रकार उत्पन्न होईल. दुसरा प्रकार काढणें झाल्यास पहिले प्रकारांतील पहिलें अक्षर घ्यावें आणि असा विचार करावा कीं,

त्याचे पूर्वीचें स्वराक्षर (मूलक्रमाप्रमाणें) वरच्या प्रकारांत त्या स्वराक्षराचें पुढें आलें आहे किंवा नाहीं; नसल्यास तें स्वराक्षर (पूर्वीचें) त्या स्वराक्षरांखालीं मांडावें, आणि त्यापुढें वरच्या प्रकारांतील बाकीचीं त्या पुढचीं सर्व स्वराक्षरें आहेत तशींच उतरून घ्यावीं. पाठीमागें जागा राहिली असल्यास बाकी राहिलले स्वर मूलक्रमानें पाठीमागें मांडावे; परंतु हा प्रकार मांडतेवेळीं स्वराक्षराचे खालीं लिहावयाचें अक्षर (पूर्वीचें) वरच्या प्रकारांत त्या स्वराक्षराचें पुढें आलें असेल तर तेंही पूर्वीचें स्वराक्षर सोडून त्याचे पूर्वीचें पुढें न आलेलें अक्षर खालीं लिहावें; जर तेंही आलें असेल तर त्या पूर्वीचें स्वराक्षर घ्यावें. याप्रमाणें पूर्वीच्या सर्व अक्षरांचा विचार केल्यावर (सचा) त्या अक्षराचा विचार सोडून दुसऱ्या अक्षरावर जावें; आणि वर सांगितलेप्रमाणें बाकीचीं स्वराक्षरें भरून घ्यावीं.

स्पष्टीकरण.

स—या एका स्वराचा विस्तार एक (स) होतो. कारण, याचे पूर्वी (मूलक्रमाप्रमाणें) कोणतेंही अक्षर नाहीं व पुढेंही अक्षर नाहीं; ह्मणून उलटपालट होण्याला व पूर्वीचें अक्षर पुढें येण्याला जागाच नाहीं.

स, र—हे दोन स्वर घेऊन विस्तार करावयाचा.

प्रथम **स र** हे (मूल क्रमानें) जसेच्या तसेंच मांडिले, हा पहिला प्रकार झाला. आतां दुसरा प्रकार काढावयाचा तेव्हां असा विचार करावयाचा कीं, पहिल्या प्रकारांतील पहिलें अक्षर **स** याच्या पूर्वीचें स्वराक्षर त्याच्या पुढें आलें आहे कीं नाहीं ; जर आलें नसेल तर तें **स**च्या खालीं मांडावें. परंतु, मूल क्रमाप्रमाणें **स**च्या पूर्वी मुळीं अक्षरच नाहीं, तेव्हां तें **स**च्या पुढें कसें येणार! अर्थात् **स**चा विचार सुटला ; पुढें **र**चा विचार करूं. **स र** या प्रकारांत **र**च्या पूर्वीचें अक्षर (मूल क्रमाप्रमाणें) **स** हें **र**च्या पुढें आलेलें नाहीं ; ह्मणून तें
स र **र**च्या खालीं लिहिलें ; तसेंच **स र** या प्रकारांत **र**च्या पुढें अक्षरें नाहींत
स
ह्मणून खालीं लिहिलेल्या **स**च्या पुढें अक्षरें लिहावयाला नाहींत; पण **स**च्या पाठीमागें जागा राहिली आहे. त्या ठिकाणीं उरलेलीं अक्षरें मूल क्रमाप्रमाणें लिहावयाचीं. **स र** यांतील **स** गेल्यावर **र** हें अक्षर उरलें, तें **स**च्या मागें लिहिलें ह्मणजे **र स** हा दुसरा प्रकार झाला. याच्या पुढें आणखी एखादा प्रकार होतो आहे किंवा नाहीं हें पाहूं. दुसरा प्रकार **र स** यांतील पहिलें अक्षर **र** घेऊन विचार करावयाचा कीं, याचे पूर्वीचें (मूल क्रमाप्रमाणें) अक्षर याचें पुढें आलें आहे किंवा नाहीं. **र**च्या पूर्वीचें अक्षर **स** हें **र**च्या पुढें आहे. व **स**च्या पूर्वी अक्षरच नाहीं, तेव्हां **र**चा विचार झाला. पुढें **स**चा विचार करूं. **स**च्या पुढें **स**च्या पूर्वीचें अक्षर आलें आहे किंवा नाहीं, हें पहावयाचें ; पण (मूल क्रमांत) **स**च्या पूर्वी अक्षरच नाहीं, तेव्हां **स**चाही विचार संपलाच, तेव्हां **र स** हा प्रकार झाला कीं यापुढें प्रकार होत नाहीं, असें ठरलें; ह्मणून दोन स्वरांचा विस्तार दोनच होतो. **१ स र २ र स.**